खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर

तृतीय वर्ष कला

सेमिस्टर पाचवे

इतिहास

(HIS - 391 – MN)

स्वातंत्र्योत्तर भारत (१९४७-१९९१)

स्वातंत्र्योत्तर भारत (१९४७-१९९१)

घटक १ : स्वातंत्र्य आणि फाळणी (१०)

अ) फाळणी व परिणाम

आ) संस्थानांचे विलीनीकरण - काश्मीर, जुनागढ व हैद्राबाद

इ) भारतीय राज्यघटना आराखडा आणि वैशिष्ट्ये

घटक २ : नेहरू युगातील राष्ट्रनिर्माण (१०)

अ) पंचवार्षिक योजना आणि आर्थिक विकास

आ) इस्त्रो बार्क आयआयटी युजीसी आयआयएम एम्स डीआरडीओ यांची निर्मिती स्थापना

इ) परराष्ट्र धोरण - अलिप्ततावादी चळवळ, भारत - चीन संबंध, भारत - पाकिस्तान संबंध

घटक ३ : आव्हाने आणि बदल (१०)

अ) आणीबाणी, ऑपरेशन ब्ल्यू स्टार, आसाम संकट, नाम २० कलमी कार्यक्रम, हरित क्रांती, भारत सोव्हिएत करार, बांगलादेशची निर्मिती

आ) संगणक व दूरसंचार क्रांती, पंचायत राज

इ) उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण धोरण (खाऊजा)

तृतीय वर्ष कला

इतिहास सामान्यस्तर अभ्यासक्रम

(२०२६-२७ पासून)

सेमिस्टर पाचवे

स्वातंत्र्योत्तर भारत (१९४७-१९९१)

घटक २ : नेहरू युगातील राष्ट्रनिर्माण

अ) पंचवार्षिक योजना आणि आर्थिक विकास

आ) इस्त्रो बार्क आयआयटी युजीसी आयआयएम एम्स डीआरडीओ यांची निर्मिती स्थापना

इ) परराष्ट्र धोरण - अलिप्ततावादी चळवळ, भारत - चीन संबंध, भारत - पाकिस्तान संबंध

प्रास्ताविक

स्वातंत्र्यपूर्वकाळात साम्राज्यवाद्यांच्या दडपशाही व शोषणामुळे येथील घडी पूर्णत विस्कळीत झाली होती. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर देशाच्या पुनर्बांधणीचे आणि राष्ट्रनिर्माणाचे मोठे आव्हान होते. त्यातच फाळणीमुळे आर्थिक व दंगलीमुळे सामाजिक समस्यांमध्ये भर पडली. निर्वासित पुनर्वसनाचा प्रश्नही गंभीर होता. स्वातंत्र्यानंतर ही सर्व आव्हाने पेलत सामाजिक, आर्थिक पुनर्रचनेसाठी नेतृत्वाने प्रयत्न सुरु केले. समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. स्पर्धात्मक समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले. आर्थिक विकसासाठी नियोजन सर्वांना मान्य होते. त्यानुसार पं. नेहरूंनी भांडवलशाही अर्थव्यवस्था व समाजवादी अर्थव्यवस्था यांचा योग्य समन्वय साधून नियोजनबध्द विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्थेची मांडणी केली. १९४८ च्या धोरणात्मक ठरावात त्यांची ही भूमिका स्पष्ट झाली. भारतात साधारणपणे १९९१ पर्यंत मिश्र अर्थव्यवस्था अस्तित्वात होती. पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान झाले. नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारताने लोकशाही धर्मनिरपेक्षता समाजवाद वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नियोजनबद्ध आर्थिक विकास यांना महत्त्व दिले. त्यांच्या कार्यकाळात राष्ट्रनिर्माणाची बीजे रोवली गेली. भारताच्या भविष्याच्या वाटचालीसाठी नेहरूंचे राष्ट्रनिर्माण धोरण महत्त्वाचे ठरले. नियोजनबद्ध आर्थिक विकास, औद्योगिकीकरणावर भर, सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार, शेती व सिंचनाचा विकास, वैज्ञानिक व तांत्रिक शिक्षणाचा विकास, उच्च शिक्षणासाठी संस्थांची निर्मिती, अणुऊर्जा व अंतराळ संशोधनाला चालना, संरक्षण संशोधनाला प्रोत्साहन व आधुनिक आणि स्वावलंबी भारताची निर्मिती ही पं. नेहरूंच्या राष्ट्रनिर्माण धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

अ) पंचवार्षिक योजना आणि आर्थिक विकास

प्रास्ताविक

स्वातंत्र्याच्या वेळी भारताची आर्थिक परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक होती. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषिप्रधान होती. औद्योगिक विकास अत्यल्प होता. बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर होती. दारिद्र्याची समस्या गंभीर होती. शेतीची उत्पादकता कमी होती. सिंचनाच्या सुविधा अपुऱ्या होत्या. देशात पायाभूत सुविधांची कमतरता होती. शिक्षण व आरोग्याच्या सुविधा मर्यादित होत्या. ब्रिटिश राजवटीमुळे भारताची औद्योगिक व आर्थिक रचना कमकुवत झाली होती. त्यामुळे आर्थिक विकासासाठी नियोजनबद्ध विकासाची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे भारताने नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारत देशात नियोजन राबविले. स्वातंत्र्यपूर्व काळातच या भविष्यातील मार्गाविषयी नेतृत्वाने विचार केला होता. रशियात यशस्वी ठरलेल्या पंचवार्षिक योजनाचा आपल्यावर प्रभाव पडला होता. आर्थिक विकास योजना आखणीसाठी १९५० मध्ये नियोजन मंडळ स्थापना झाली. देशाच्या उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करणे. आर्थिक विकासाचे नियोजन करणे. उत्पादन वाढविणे. रोजगाराच्या संधी वाढविणे. दारिद्र्य कमी करणे. प्रादेशिक आर्थिक विषमता कमी करणे. देशाला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे. ही नियोजन मंडळाची उद्दिष्ट्ये होती. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांनुसार पंचवार्षिक योजना आखण्याची जबाबदारी १९५१ मध्ये नियोजन मंडळावर सोपविण्यात आली. १९५१ पासून आपण पंचवार्षिक योजना राबविण्यास सुरुवात केली. १९५१ ते २०१७ या कलावधीत आपण १२ पंचवार्षिक योजना राबविल्या. त्यानंतर पंचवार्षिक योजना बंद करण्यात आल्या. येथे आपण १९९० म्हणजे सातव्या योजनेपर्यंतचा विचार करणार आहोत.

१९९० पर्यंतच्या पंचवार्षिक योजना व त्यांचा कार्यकाळ

पहिली पंचवार्षिक योजना - १९५१ ते १९५६
दुसरी पंचवार्षिक योजना - १९५६ ते १९६१
तिसरी पंचवार्षिक योजना - १९६१ ते १९६६
चौथी पंचवार्षिक योजना - १९६९ ते १९७४
पाचवी पंचवार्षिक योजना - १९७४ ते १९७८
सहावी पंचवार्षिक योजना - १९८० ते १९८५
सातवी पंचवार्षिक योजना - १९८५ ते १९९०

पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ ते १९५६)

आर्थिक विकासासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेस अंतिम रूप देण्यात आले. १ एप्रिल १९५१ रोजी पहिली पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. युध्द व फाळणीमुळे अर्थव्यस्थेचा विस्कळीतपणा व असंतुलन नाहीसे करून देशाचा जलद संतुलीत सर्वांगीण विकासासाठी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे. हे या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट होते. नियोजनामुळे आर्थिक विषमता कमी होऊन दरडोई उत्पन्न वाढून लोकांचे जीवनमान उंचावेल ही अपेक्षा होती. अन्नधान्य टंचाई व भाववाढ या योजनाकारांपुढे दोन समस्या होत्या. त्यामुळे या योजनेत शेती विकासावर भर देण्यात आला. म्हणून ही योजना कृषी योजना म्हणून ओळखली जाते. या योजनेसाठी २३७८ कोटी रूपये खर्च अपेक्षित होता. कर आकारणी रेल्वेचे जास्तीचे उत्पन्न देशातंर्गत कर्ज अल्पबचत योजना अशा मार्गांनी योजनेसाठी ९० टक्के निधी उभारला. उरलेला १० टक्के मदत तांत्रिक स्वरूपात अमेरिकेकडुन ट्रुमन योजनेव्दारे मिळाली.

चांगला पाऊस शिलकेच्या स्वरूपात विदेशी मुद्रेचा संचय कच्चा मालाचा मुबलक पुरवठा भांडवलाची नव्याने झालेली गुंतवणुक व श्रमशक्तीचा अधिकाधिक उपयोग यामुळे पहिली पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठी पुरक ठरल्या. याकाळात राष्ट्रीय उत्पन्न १२ ऐवजी १८ टक्के वाढले. धान्य उत्पादन ६३० लक्ष टन होते ते ४० लक्ष टनाने वाढले. धान्य उत्पादन २० टक्के तर कापसाचे २५ टक्याने वाढले. १९५० मध्ये २.२६ कोटी हेक्टर जमीन ओलीताखाली होती ती २.५६ कोटी हेक्टरने वाढली. औद्योगीक उत्पादनात वार्षिक ८ टक्के वाढ झाली. किंमतीची पातळी योजना काळात १३ टक्क्यांनी घटली. सिमेंट उत्पादन ७१ टक्के वाढले. मोटार उत्पादन ५३ टक्के वाढले. विद्युतनिर्मिती ३.४ दशलक्ष किलोवॅट झाली. ३८० मैल लांबीची रेल्वे लाईन टाकून झाली. ४३० मैल लांब लाईनची दुरूस्ती झाली. रेल्वे निर्मिती भारतातच सुरू झाली. ६३६ मैल लांबीचे नवे महामार्ग बांधण्यात आले. ४००० लांबीच्या रस्त्याची दुरूस्ती झाली. शाळेतील मुलांची संख्या ३३ टक्के वाढली. आरोग्य सुविधा निर्माण झाल्या. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्याकाळात भाक्रा-नांगल, हिराकूड धरण व दामोदर खोरे प्रकल्प हे महत्त्वाचे प्रकल्प झाले. थोडक्यात भारताची अर्थव्यवस्था सावरली. बहुतेक उद्दिष्टे साध्य झाली.

दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ ते १९६१)

पहिल्या योजनेच्या यशाने आत्मविश्वासाने महक्तवाकांक्षी अशी दुसरी योजना आखण्यात आली. यात औद्योगिकीकरणावर भर देण्यात आला. पहिल्या योजनेमुळे मुलभूत त्रुटी दुर होऊन अर्थकारणाला स्थैर्य व गती आली होती. त्यामुळे औद्योगिकीकरणाला प्राधान्य मिळणे स्वाभाविक होते. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग महत्त्व व व्याप्ती वाढवुन देशाचा जलद आर्थिक विकास घडवत समाजावादी समाजरचनेच्या दिशेने वाटचाल करणे. मूलभूत जड उद्योग विकासावर भर देणे. कुटीर व लघु उद्योगांव्दारे उपभोग्य वस्तू उत्पादन वाढविणे. शेती उत्पादन क्षमता शेतमाल उत्पादन व शेतकयाची क्रयशक्ती वाढविण्यास जमिनीचे न्याय्य व समतेच्या आधारावर वितरण करण्यास आवश्यक भूमी सुधारणा करणे. गरीबांना घर शिक्षण व आरोग्य सुविधा देणे. कमीत

कमी काळात बेकारी निर्मुलन करणे. योजनाकाळात राष्ट्रीय उत्पन्नात २५ टक्के वाढ करणे. ही उद्दिष्टे होती.

ही योजना काही प्रमाणात यशस्वी झाली. नियंत्रणाबाहेरच्या काही गोष्टींमुळे अपयश आले. पाऊस समाधानकारक न झाल्यानेे अर्थव्यवस्था विस्कळीत झाली. शिवाय जागतिक राजकारणातील काही घडामोडींमुळे जागतिक बाजारात किंमती आकाशाला भिडल्या. त्यामुळे निश्चीत केलेली उद्दिष्टे साध्य करता आली नाही. योजनाकाळात राष्ट्रीय उत्पन्न २५ ऐवजी २० टक्केच वाढले. वार्षिक धान्य उत्पादन १६७० लक्ष टनावरून ८२० लक्ष टनावर आले. याकाळात पोलाद कारखाने हेवी केमीकल फ^क्टरी मशीन टुल्स फ^क्टरी सिमेंट आणि कागद यांचे नवे कारखाने सुरू झाले तरी ज्यूट कोळसा पोलाद यात निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य झाली नाही. सार्वजनिक क्षेत्रा जेमतेम उद्दिष्टाएवढी गुंतवणूक झाली. बेकारी निवारणातही अपयश येऊन ९ दशलक्ष लोक बेकार राहिले. योजनाकाळात जलसिंचन क्षेत्र ७० दशलक्ष एकरपर्यंत वाढले. यंत्रोत्पादन कारखाने वाढले. सिमेंट ९० तर विद्युत उत्पादन ७० टक्के वाढले. दामोदर व्ह^ली भाक्रानांगल तुंगभद्रा व हिराकुड ही चार बहुउद्देशीय धरणे विकसित झाली. नागार्जुन सागर चंबळ व कोयना यांचे कामही सुरू झाले. याकाळात अर्थव्यवस्था विकसनशील बनली. या योजनेत वैज्ञानिक व तांत्रिक शिक्षणावर भर दिला होता. अनेक संशोधन संस्थांची उभारणी झाली,. आरोग्यविषयक सेवा वाढल्या. पण अनेक नैसर्गिक आंतरराष्ट्रीय राजकीय प्रशासकीय अडथळे ही निर्माण झाले,. त्यामुळे योजनेचा वेग मंदावला. दारिद्रय कमी झाले नाही. जीवनमान खालावले. समाजातील दुर्बलातील घटकाला आर्थिक लाभ देण्याचा उद्देश सफल झाला नाही. दुसरी पंचवार्षिक योजनेच्याकाळात भिलाई, रौर्केला व दुर्गापूर हे महत्त्वाचे पोलाद प्रकल्पांचे कामा झाले व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळे भारताच्या औद्योगिकीकरणाचा पाया मजबूत झाला.

तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६)

भारताला स्वावलंबी आणि गतिमान अर्थव्यवस्था बनविणे उद्देशाने या योजनेची आखणी झाली. १९६१ मध्ये तिसरी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. आर्थिक विकासासाठी शेती उत्पादन वाढ गरजेची असल्याचे लक्षात आले होते. त्यानुसार तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रास प्राधान्य देण्यात आले. देशाच्या जलद विकासासाठी पायाभूत उद्योगाकडेही या पंचवार्षिक योजनेत लक्ष देण्यात आले. उद्योग व शेतीचे संतुलन करण्याचा प्रयत्न होता. राष्ट्रीय उत्पन्नात पाच टक्के वाढीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. विषमता कमी करणे व रोजगार संधीची निर्मिती यावर भर देण्यात येणार होता. या पंचवार्षिक योजनाकाळात आपल्याला दोन युद्धास (१९६२ चीन व १९६५ पाकिस्तान) सामोरे जावे लागले. त्यातच या या योजना काळात (१९६५-६६) भीषण दुष्काळाचा सामना ही आपल्याला करावा लागला. सर्व उद्दिष्ट पुरती दुरापस्त झाली.

चौथी पंचवार्षिक योजना (१९६९ ते १९७४)

१९६६ मध्ये तिसरी पंचवार्षिक योजना संपली. १९६६ मध्येच चौथ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा तयार झाला होता पण युद्ध व दुष्काळ प्रश्नाच्या परिणाम स्वरूप यश आणि गरज लक्षात घेऊन मध्ये काही वार्षिक योजना (तीन वार्षिक योजना) राबविण्यात आल्या. १९६९ मध्ये चौथी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. स्थैर्यासह वृद्धी व आर्थिक स्वावलंबन ही या योजनेची उद्दिष्ट्ये होती. वार्षिक उत्पन्न वाढीचे लक्ष्य या योजनेत ५० टक्केच गाठता आले. औद्योगिक उत्पादनही अपेक्षेप्रमाणे वाढले नाही. विदेशी मदतीची गरज आपल्याला होती. बेकारी वाढतच होती. उद्योगांना अपेक्षित कार्यक्षमता गाठता आली नाही परिणामी ही योजना पूर्णत: यशस्वी झाली नाही.

पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७८)

१९७४ मध्ये पाचवी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. पाचवी योजना सुरु झाली त्यावेळी देशापुढे अनेक आर्थिक प्रश्न गंभीर बनले होते. चलनवाढीचा प्रश्न तीव्र झाला होता. समाजवादी समाजरचना स्थापन करण्यात अद्यापही पुरेसे / समाधानकारक यश मिळाले नव्हते. त्यामुळे आत्तापर्यंत राहिलेले दोष दूर करून जलद विकासाचे उद्दिष्ट या योजनेत ठेवण्यात आले. आर्थिकदृष्ट्या अविकसित समाजाकडे विशेष लक्ष देण्याचे ठरले होते. अनेक कल्याणकारी कार्यक्रमाची आखणी करून त्यासाठी आर्थिक तरतूदही करण्यात आली. राजकीय हेतूने भव्य दिव्य उद्दिष्टे ठेवली होती. पण आणीबाणी व बदलत्या राजकीय संदर्भामुळे योजनेस कार्यकाळ पूर्ण करता येणे अशक्य झाले.

सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते १९८५)

भारतात मधला काळ राजकीय दृष्ट्या मोठ्या बदलांचा ठरला. जनता पक्ष व पुन्हा कॉंग्रेसकडे सत्ता सूत्रे आली. कॉंग्रेसने पुन्हा सत्ता मिळाल्यावर १९८० मध्ये सहावी पंचवार्षिक योजना सुरु केली. उपलब्ध साधनसामग्रीचा पुरेपूर वापर करून उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट या योजनेत होते. त्याच बरोबर आर्थिक व तांत्रिक स्वयंपूर्णता मिळवायची होती. दारिद्र्य व बेकारी दूर करायची होती. लोकसंख्या नियंत्रण व पर्यावरणाची जपवणूक याकडेही लक्ष देण्यात आले. या योजनेत मोठा खर्च झाला. याकाळात महागाईही वाढली. परिस्थिती व गरजेनुसार या योजनेत प्राधान्यक्रम बदलण्यात आला. या योजनाकाळात राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली.

सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते १९९०)

१९८५ मध्ये सातवी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. आधीची योजना यशस्वी झाली असल्याने ही योजना आयोजन व राबविण्यात उत्साह होता. दारिद्र्य, बेकारी व प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे मोठे ध्येय ठरवत योजना सुरु करण्यात आली होती. गरजेनुसार अन्नधान्य उत्पादन वाढविणे व औद्योगिक उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट या योजनेत होते. सहाव्या योजनेप्रमाणेच या योजनेतही नियोजनापेक्षा अधिक खर्च झाला. या योजना काळात खत,

खनिज तेल, उर्जा, कोळसा, नैसर्गिक वायू, पोलाद, सिमेंट, रेल्वे व दूरसंचार अशा विविध क्षेत्रात मोठी प्रगती झाली.

योजनाकाळातील विविध क्षेत्रातील प्रगती

अ. औद्योगिक प्रगती

१९५५ मध्ये समाजवादी समाजरचनेच्या ध्येयानुसार अवजड व पायाभूत उद्योगात सरकारी मालकी राखुन ठेवली. रसायन उद्योग सागरी वाहतूक व रोड ट्रान्सपोर्ट खते कृत्रिम रबर व यांत्रिक हत्यारे उद्योगातही सरकारने पदार्पण केले. बँका विमा व्यवसाय व उद्योगधंदयांचे राष्ट्रीयकरण केले.

०१. खाण व्यवसायातील प्रगती

खनिज संपत्ती समृध्दी लक्षात घेऊन त्यात मोठी भांडवल गुंतवणुक करत खाण उद्योग भरभराटीस आणला. योजना काळात बा^क्साईट पासून अल्युमिनियम निर्मितीचा उद्योग भरभराटीस आला. विद्युत उपयोगाच्या अभ्रकाबाबत जगात अग्रक्रम मिळविला. पोलाद निर्मितीसाठी आवश्यक म^ग्नीजच्या ५३७ खाणी सुरू झाल्या. लोखंड कोळसा खाण उद्योगही भरभराटीस आले.

०२. खनिज तेल

पूर्वी दिग्बोईची आसाम आ^ईल कंपनी एकमेव रिफायनरी होती. त्यामूळे गरजेच्या ९५ टक्के आयात करावी लागे. तेव्हा तीन विदेशी कंपन्यांना तेलशुध्दीकरण कारखाने काढण्यास परवानगी दिली. त्यानुसार मुंबर्इ विशाखाप+णम्ला कारखाने सुरू झाले. १९५८ मध्येे शासनाने इंडियन रिफायनरिज लि. संस्था स्थापली. रूमानियाशी करार करून आसामात नुनमती व १९५९ मध्ये रशियाच्या मदतीने बिहारला रिफायनरी उघडली. आसामातील विंधन विहीरीतील तेल त्यासाठी वापरले जाई. तेल वाटपासाठी इंडियन आ^ईल कंपनी स्थापन केली. तेल संशोधन कार्यासाठी प्रयत्न केले. त्यातून पंजाबातील होशियारपूर आसामातील रूद्रसागर गुजतातेतील खंबायत व कलोल येथे तेल विहिरी खोदण्यात आल्या.

०३. लोखंड व पोलाद उद्योग

स्वातंञ्यपूर्व काळात देशी विदेशी उद्योजकांनी येथे उद्योग सुरू केले होते. अनेक उद्योग या लोखंड पोलाद उद्योगावर अवलंबुन होते. दुसया योजनेत रूरकेला भिलाई व दुर्गापूर येथे अनुक्रमे जर्मन रशिया व इंग्लंड तंत्रज्ञांच्या सा*याने कारखाने सुरू झाले. या उद्योगांच्या देखरेखीसाठी हिंदुस्थान स्टील कंपनी स्थापन करण्यात आली. त्यामुळे १९४७ पेक्षा १९६० मध्ये लोखंड पोलाद उत्पादन तिप्पट झाले.

०४. यंत्रोत्पादन

योजनाकाळात बंगलोरच्या शासकीय हिंदुस्थान मशीन टुल्स लि. कंपनीने भरीव प्रगती केली. दरवर्षी १६२ प्रकारची २००० यंत्रे बाहेर पडतात. १९६१ पासून घडयाळ निर्मितीसही सुरूवात

केली. जल व औष्णिक विद्युत निर्मितीस लागणारी यंत्रे जनरेटर विद्युत मोटारी निर्मिती भोपाळला सुरू केली. हरिव्दार हैद्राबाद तिरूचिरापल्ली येथेही कारखाने सुरू झाले. हिमाचल प्रदेशात शेती औजारे बंगालात विद्युतवाहक तारा कर्नाटकात विमान लष्कर पोलीस रेल्वे नभोवाणी खाते यांना लागणारी ध्वनीप्रक्षेपण यंत्रे रडार ही साधने निर्माण केली जातात. कलकत्त्यात संशोधनासाठी लागणारी २५० प्रकारची उपकरणे केली जातात. उटकमंडला फिल्मचा रांचीस अवजड यंत्र व दुर्गापूरला यंत्रनिर्मितीचा कारखाना उघडण्यात आला.

०५. वाहनांचे कारखाने

बंगलोरच्या हिंदुस्थान एअर क्राFट कंपनीत १९५६ पासून न^ट व व्ह^म्पायर ही लढाऊ विमाने १९५८ पासून Fलाईंग क्लबसाठी पुष्पक विमाने १९५९ पासून फवारणीसाठी कृषक विमाने निर्माण होऊ लागली. हिंदुस्थान शिपयार्डने आधुनिक जहाज बांधणी विशाखाप+णम्ला सुरू केली. मुंबई व कलकत्त्याच्या ब्रिटिश कंपन्या ताब्यातील गोद्या ताब्यात घेऊन जहाजबांधणी सुरू केली. रेल्वे बांधणीस चित्तरंजन लोकोमोटीव्ह वक्र्स सुरू केले. स्वित्झर्लंड मदतीने पेर^म्बूरला इंटिग्रल कोच फ^क्टरी रेल्वे डबे निर्मितीस सुरू केली.

०६. रसायने व औषधी उद्योग

१९५१ ला सिंद्री येथे अवजड रसायन निर्मितीस सुरूवात झाली. युनो मदतीने हिंदुस्थान इन्सेक्टीसाइड लि. स्थापन झाली. दिल्ली व केरळात डी. डी. टी. चे कारखाने सुरू झाले. त्यामुळे मलेरिया निर्मुलनास मदत झाली. हिंदुस्थान अ^ण्टीबायोटिक्स लि. संस्थाही स्थापन होऊन पिंप्रीस पेनिसिलीन निर्मितीचा कारखाना काढला. याच बरोबर तेथे इतर बहुगुणी जंतुनाशकांचीही निर्मिती होऊ लागली.

०७. कृत्रिम खते

१९४७ पासून फर्टिलायझर अँड केमिकल्स त्रावणकोर लि. कृत्रिम खते निर्माण करत होती. १९५१ मध्ये शासनाने सिंद्री फर्टिलायझर्स अँड केमिकल्स लि. स्थापून खत निर्मितीस चालना दिली. लहान मोठया कारखान्यांचे एकत्रिकरण करून शासनाने १९६१ मध्ये फर्टिलायझर का^र्पोरेशन आ^फ इंडिया लि. स्थापन केली. तिने नांगल रूरकेला कोरबा मुंबई गोरखपूर नहरकटीया येथे खत निर्मिती कारखाने सुरू केले.

ब. शेतीक्षेत्रातील प्रगती

शेतीप्रधानतेमुळे भूमी प्रश्नाला भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे महत्त्व आहे. त्याचे महत्त्व नियोजन मंडळानेही योजनांमध्ये मान्य केले. शेती समस्येच्या जमीन मालकी प्रश्न जमीन मालक आपसी संबंध ही एक बाजू व जादा उत्पादन घेणे सिंचन क्षेत्र वाढविणे कर्जपुरवठा प्रगत बियाणे व यांत्रिकीकरण ही दुसरी बाजू आहे. योजनाकाळात या दोन बाजू समस्या सोडविण्यास प्रयत्न करण्यात आले.

०१. जमीनदारी पध्दतीचे निर्मुलन

जमीनदारांमुळे आर्थिक विषमता वाढते. ते शहरात राहुन सारा वसुलीस मध्यस्थ नेमतात त्यामुळे कुळांचे मोठे शोषण होत असे. जमीन मालकी नसल्याने कुळे शेतीत पैसा गुंतवत नसत तर जमीनदार शेतीकडे दुर्लक्ष करत. त्यामुळे उत्पादन कमी होई. त्यामुळे योजनाकाळात जमीनदारी नष्ट करण्याकडे लक्ष देण्यात आले. १९६१ पर्यंत सर्व राज्यात जमीनदारी निर्मुलनाचे कायदे पास झाले. त्यामुळे सरकारला सारा गोळा करण्याचा अधिकार मिळून मध्यस्थ वर्ग नष्ट झाला. सुमारे ६० लाख जमीन कसणायांना जमीन मालकी मिळाली.

०२. कूळकायदे

जमीनदारीप्रमाणेच रयतवारीतही मालक कुळाकडून जमिन कसून घेत. योजनाकाळात नियोजन मंडळाच्या शिफारशी नुसार अनेक राज्यांनी कूळकायदे करून खंडाची रक्कम कमी केली. कसणायांला जमीन देण्याचे कायदे विविध राज्यात पास झाले. त्यामुळे सुमारे ३० लाख कूळांना जमिन मालकी मिळाली.

०३. धारणक्षेत्राची कमाल मर्यादा

जमीन धारणेबाबत समानता असावी व भूमीहीनांना जमीन मिळावी व जादा जमीनीचे वितरण व्हावे त्यायोगे ग्रामीण क्षेत्रात अधिक समता यावी. शेती उत्पादन वाढावे यासाठी जमीन धारणेच्या कमाल मर्यादा निश्चित करण्यात आल्या. व भूमीहिनांना जमीन वाटण्यात आली.

०४. तुकडेबंदी संबंधित कायदे

वारसा हक्क कर्जबाजारीपणा वाढती लोकसंख्या व ग्रामीण व्यवसायाची हालाखी यामुळे शेतीचे विभाजन होऊन लहान लहान तुकडे झाले. त्यामुळे शेती व्यवसाय तोटयात जाऊ लागला. १९६१ पर्यंत सर्व राज्यांनी तुकडेबंदी करून तुकडे जोड सक्ती केली. त्यातून भारतात ४. ४कोटी हेक्टर जमिनीचे एकत्रिकरण करण्यात आले.

०५. धरणे व पाटबंधारे

पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेती उत्पादन वाढीसाठी योजनाकाळात अनेक धरणे व पाटबंधारे योजना हाती घेण्यात आल्या. १९६१ पर्यंत ३०० योजनांपैकी ६८ पाटबंधारे योजना मोठया होत्या. देशातील सुमारे ४. ५कोटी हेक्टर जमीनीला पाणी पुरवठा सोय झाली. ओलीतक्षेत्र वाढविण्यात आले.

०६. कर्जपुरवठा

शेतकयाचा कर्जबाजारीपणा कमी व्हावा. शेतीला वेळेवर वाजवी दराने भांडवल मिळावे म्हणून योजनाकाळात बँका व सहकारी पतपेढयांमार्फत पैसा उपलब्ध करून देण्यात आला.

०७. कृषी संशोधन केंद्राची स्थापना

शेती विकासास संस्थात्मक कार्यवाही बरोबर तंत्रात्मक सुधारणा आवश्यक ठरतात. त्यासाठीही प्रयत्न केले. अनेक कृषी संशोधन केंद्रे स्थापन केली. अधिक उत्पादनाच्या पिक जाती

शेतकयांना उपलब्ध करून दिल्या. तसेच दर्जेदार बियाणांसाठी न^शनल सीडस् कार्पोरेशनची स्थापना केली. सुधारीत तंत्राबाबत सरकारकडून शेतकयांना मार्गदर्शन मिळू लागले. यामुळे शेती उत्पादन वाढण्यास मदत झाली.

पंचवार्षिक योजना यश

१. राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नात वाढ
२. अर्थव्यवस्थेचा उच्च वृद्धी दर
३. शेती क्षेत्राचा विकास
४. औद्योगिक क्षेत्राची प्रगती
५. सामाजिक सेवांचा विकास
६. रोजगार वाढ
७. जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेत सुधारणा

पंचवार्षिक योजना अपयश

१. गरिबी हटाव अपयश
२. रोजगार निर्मितीत अपयश
३. विषमता कमी करण्यात अपयश
४. आर्थिक विकेंद्रीकरणात अपयश
५. जमीन सुधारणा अपयश
६. शेती भर कमी करण्यात अपयश

औद्योगिक विकास

प्रास्ताविक

देशाची अर्थव्यवस्था मजबुत करण्यासाठी औद्योगिक विकास होणे आवश्यक आहे. ब्रिटिश काळात औद्योगिक विकासाचा वेग मंदावला होता. नियोजनाच्या काळामध्ये औद्योगिक विकासाच्या दृष्टीने योग्य ती पावले टाकण्यात आली होती. लघु उद्योगांना प्रोत्साहन देऊन बेकारी कमी करण्यासाठी आराखडा आखला गेला. पोलाद, लोखंड, सिमेंट या उद्योगांना गती दिल्याने औद्योगिक विकासाला हातभार लागला. शेती विकासाला पोषक वातावरण तयार करण्यात आले. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा विकास मोठ्या प्रमाणावर घडून आला. भारतामध्ये सन १८५४ पासूनच औद्योगिक विकासाची सुरुवात झाली होती. मुंबईमध्ये

सुती कापडाच्या विविध गिरण्यांची स्थापना झालेली होती . दिवसेंदिवस त्यामध्ये वाढ होत गेली. सन १९५२ मध्ये ही संख्या ३७८ एवढी होती तर १९९८ मध्ये ही संख्या १९९८ एवढी झाली. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये कापड उद्योगाचे योगदान अधिक महत्त्वपूर्ण मानले जाते. पुढे या उद्योगांचे खाजगी व सार्वजनिक अशा प्रकारांमध्ये विभाजन करण्यात आले. औद्योगिकीकरण ही एक प्रक्रिया असून यामध्ये नैसर्गिक साधनसामग्री व इतर कच्चा माल यावर प्रक्रिया करून उपभोगासाठी आवश्यक अशा वस्तूंचे उत्पादन केले जाते. औद्योगिकीकरणाला अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळेच देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होते. भारतात संघटित व असंघटित क्षेत्रात उद्योगाची वाढ झालेली आहे. संघटित क्षेत्रात लोखंड, पोलाद, सिमेंट, साखर, ताग, खते, कापड व अभियांत्रिकी उद्योगांचा समावेश होतो तर असंघटित क्षेत्रात लघुउद्योग, कुटीरउद्योग, खादी व ग्रामउद्योग इत्यादींचा समावेश होतो. आर्थिक विकासातील औद्योगिकीकरणाची भमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

औद्योगिक विकासाची भूमिका

नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर

भारतातील मोठ्या प्रमाणावरील नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर संघटित व असंघटित क्षेत्रातील उद्योगामुळे शक्य झाले आहे. भारतात अजुनही खनिज साधनसामग्री जंगल व कृषी आधारित साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. या सर्वांच्या विकासाच्या दृष्टीने योग्य वापर करता येऊ शकतो.

समतोल क्षेत्रिय विकास

भारतीय अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर शेतीवर आधारित आहे व शेतीवर आधारित असणारी लोकसंख्या देखील जास्त आहे. भारतात नेहमी दुष्काळ, महापूर अशा समस्या येत असतात. त्याचा परिणाम उत्पादनावर होतो म्हणून औद्योगिकीकरणाच्या मदतीने शेतीवरील अवलंबित्व कमी करता येऊ शकते.

भांडवल निर्मितीच्या विकासात वाढ

देशातील औद्योगिक करण्याच्या विकासाबरोबरच भांडवलाचाही विकास होतो. उद्योगातील गुंतवणूकरी झालेल्या वाढीमुळे भांडवल निर्मितीचा दर वाढतो सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग हे स्थूल देशांतर्गत भांडवलनिर्मिती महत्त्वाची भूमिका बजावतात.

राष्ट्रीय उत्पन्नात वाढ

संघटित व असंघटित क्षेत्रांनी उद्योग देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात मोठ्या प्रमाणात भर घालताना दिसतात. औद्योगिकीकरणामुळे देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात या पातळीमध्ये वाढ झालेली दिसते. राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा नियोजनकाळात सातत्याने वाढलेला दिसतो.

शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणे

भारतात फार मोठी लोकसंख्या उपजिवीकेसाठी शेतीवर अवलंबून असते. या अतिरिक्त संख्येमुळे शेतीची उत्पादकता कमी झालेली दिसते. औद्योगिकीकरणामुळे औद्योगिक क्षेत्रातील रोजगार संधीत वाढ होऊन शेतीवरील अवलंबित्व कमी होते.

निर्यातीत महत्त्वपूर्ण सहभाग

अभियांत्रिकीकरणामुळे वस्तुचे उत्पादन वाढलेले दिसते. परिणामी निर्यातीचे प्रमाण वाढते. परकीय चलन मिळवून आर्थिक विकास साध्य होतो.

रोजगार संधीत वाढ

औद्योगिकीकरणामुळे शेतीक्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध होऊन बेकारीची संख्या (समस्या) कमी झालेली दिसते.

आर्थिक स्थैर्य

औद्योगिकीकरणाच्या विकासामुळे आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाची निर्मिती शेती क्षेत्रातून केली जाते. परिणामी शेतीचा विकास होतो. त्यामुळे या दोन्ही क्षेत्रात आर्थिक स्थैर्य राखण्यास सहाय्यता होते.

शेती व्यवसायाला फायदा

औद्योगिक विकासामुळे शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालाला योग्य किंमत मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांचे एकूण उत्पन्न वाढलेले दिसते.

सरकारी तिजोरीत भर

औद्योगिकीकरणाच्या विकासामुळे सरकारला मिळणाऱ्या कर व जकातीत वाढ झाली. त्याचबरोबर आकारले जाणारे कर याचेही प्रमाण वाढलेले दिसते.

अशाप्रकारे देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी औद्योगिक विकासाची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. नियोजन काळात लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांच्या उपक्रमांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जातात. त्यामुळे देशात वेगाने औद्योगिक विकास घडवून आलेला दिसतो. यांत्रिकीकरण, कारखानदारी यांच्यामुळे औद्योगिक क्षेत्रात मोठा विकास झालेला दिसतो.

आ) इस्त्रो बार्क आयआयटी युजीसी आयआयएम एम्स डीआरडीओ यांची निर्मिती स्थापना

(आधुनिक वैज्ञानिक व शैक्षणिक संस्थांची निर्मिती)

प्रास्ताविक

नेहरूंच्या राष्ट्रनिर्माणाच्या संकल्पनेत **विज्ञान आणि तंत्रज्ञानाला अत्यंत महत्त्वाचे स्थान** होते. नेहरूंनी वैज्ञानिक दृष्टिकोनाला आधुनिक भारताच्या विकासाचे महत्त्वाचे साधन मानले.त्यांच्या काळात अनेक राष्ट्रीय संस्थांची निर्मिती झाली किंवा त्यांचा विस्तार करण्यात आला. अंतराळ संशोधनासाठी ISRO, अणुविज्ञानसाठी BARK, तंत्रज्ञान व अभियांत्रिकीसाठी IIT, उच्च शिक्षणासाठी UGC, व्यवस्थापनसाठी IIM, वैद्यकीय क्षेत्रासाठी AIIMS, संरक्षण तंत्रज्ञानसाठी DRDO संस्थांची निर्मिती या काळात झाली. या सर्व संस्थांकडे एकत्रितपणे पाहिल्यास राष्ट्रनिर्माणाची दिशा स्पष्ट दिसते. म्हणजेच शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, संरक्षण व आर्थिक विकास या सर्व क्षेत्रांचा पाया मजबूत करून आधुनिक, वैज्ञानिक आणि स्वावलंबी भारत घडविण्याचा प्रयत्न नेहरू युगात झाला. या दृष्टीने महत्त्वाच्या संस्था **इस्त्रो बार्क आयआयटी युजीसी आयआयएम एम्स डीआरडीओ** या संस्थांची माहिती पुढीलप्रमाणे

इस्त्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था)

(ISRO - Indian Space Research Organization)

इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च (INCOSPAR) या संस्थेची स्थापना १९६२ मध्ये भारतामध्ये अंतराळ संशोधनाची सुरुवात करण्यासाठी करण्यात आली. यामध्ये **डॉ. विक्रम साराभाई** यांचे महत्त्वाचे योगदान होते. भारतीय अंतराळ कार्यक्रमाचा पाया **नेहरू युगात** घातला गेला. अंतराळ संशोधनाला चालना, हवामान अंदाजात मदत, दूरसंचाराचा विकास, दूरदर्शन प्रसारणाचा विस्तार, नैसर्गिक संसाधनांचे निरीक्षण, शिक्षण व विकासासाठी उपग्रहांचा वापर यासाठी अंतराळ संशोधन व त्यातील विकास महत्त्वाचा होता. त्यातून पुढे १५ ऑगस्ट १९६९ रोजी ISRO ची स्थापना करण्यात आली.

इस्त्रो कार्याचे महत्त्व व योगदान -

१. अंतराळ संशोधनाला चालना - ISRO ने भारतामध्ये अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासाला संस्थात्मक स्वरूप दिले. सुरुवातीला भारतासारख्या विकसनशील देशासाठी अंतराळ संशोधन अनावश्यक मानले जात होते; परंतु त्याचा उपयोग राष्ट्रीय विकासासाठी करता येतो, ही भूमिका स्वीकारण्यात आली.

२. उपग्रह तंत्रज्ञानाचा विकास - दूरसंचार, दूरदर्शन, हवामान अंदाज आणि पृथ्वी निरीक्षणासाठी उपग्रहांचा वापर विकसित करण्यात आला. त्यामुळे दुर्गम भागांपर्यंत माहिती आणि संपर्क व्यवस्था पोहोचविण्यास मदत झाली.

३. कृषी व नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभ्यास - उपग्रहांच्या माध्यमातून जमिनीचा वापर, पाणीसाठे, पिकांची स्थिती आणि नैसर्गिक साधनसंपत्ती यांचे निरीक्षण करता येऊ लागले. त्यामुळे नियोजन आणि संसाधन व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यास मदत झाली.

४. हवामान व आपत्ती व्यवस्थापन - उपग्रहांच्या साहाय्याने हवामानातील बदल, चक्रीवादळे, पूर आणि इतर नैसर्गिक आपत्तींचे निरीक्षण करणे शक्य झाले. त्यामुळे आपत्तीपूर्व सूचना आणि व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यास मदत झाली.

५. वैज्ञानिक स्वावलंबन - अंतराळ तंत्रज्ञानासाठी परदेशावर अवलंबून राहण्याऐवजी भारताने स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करण्यास सुरुवात केली. यामुळे भारताच्या वैज्ञानिक स्वावलंबनाला चालना मिळाली.

थोडक्यात ISRO ने अंतराळ संशोधनाला केवळ वैज्ञानिक क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता ते राष्ट्रीय विकासाचे साधन बनविले आहे. भारताला अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात स्वावलंबी बनविण्यास मदत झाली. आधुनिक उपग्रह तंत्रज्ञानाचा विकास झाला. वैज्ञानिक व तांत्रिक मनुष्यबळ विकसित झाले. राष्ट्रीय विकासासाठी अंतराळ तंत्रज्ञानाचा उपयोग वाढला.

बार्क (भाभा अणुसंशोधन केंद्र)

(BARC - Bhabha Atomic Research Centre)

१९५४ मध्ये स्थापन झालेल्या Atomic Energy Establishment, Trombay (AEET) चे १९६७ मध्ये Bhabha Atomic Research Centre (BARC) असे नामांतर क्रनाय्त आले. **डॉ. होमी जहांगीर भाभा यांचे** भारतीय अणुकार्यक्रमाच्या विकासात महत्त्वाचे योगदान असल्याने त्यांचे नाव या संस्थेस देण्यात आले.

अणुऊर्जेचा शांततामय वापर, अणुसंशोधन, अणुऊर्जा निर्मिती, वैद्यकीय क्षेत्रात अणुतंत्रज्ञानाचा वापर, कृषी व उद्योग क्षेत्रात अणुतंत्रज्ञानाचा वापर या उद्देशाने या संस्थेची निर्मिती करण्यात आली होती.

बार्क कार्याचे महत्त्व व योगदान -

१. अणुविज्ञानाचा विकास - BARC ने भारतातील अणुविज्ञान संशोधनाला संस्थात्मक आधार दिला. अणूची रचना, अणुऊर्जा आणि अणुतंत्रज्ञान यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी संशोधनाला चालना मिळाली.

२. अणुऊर्जेचा शांततामय वापर - भारताने अणुतंत्रज्ञानाचा उपयोग ऊर्जा निर्मिती आणि विकासासाठी करण्यावर भर दिला. वाढत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अणुऊर्जा महत्त्वाची ठरू शकते, या विचारातून संशोधन झाले.

३. वैद्यकीय क्षेत्रातील उपयोग - अणुतंत्रज्ञानाचा उपयोग कर्करोगासारख्या आजारांच्या निदान व उपचारात तसेच वैद्यकीय संशोधनात होऊ लागला. त्यामुळे अणुविज्ञानाचा फायदा आरोग्य क्षेत्रालाही झाला.

४. कृषी व उद्योग क्षेत्रातील उपयोग - अणुतंत्रज्ञानाचा उपयोग कृषी संशोधन, अन्नसंरक्षण, उद्योग आणि विविध वैज्ञानिक प्रक्रियांमध्ये करण्यासाठी संशोधन करण्यात आले.

५. वैज्ञानिक मनुष्यबळ निर्मिती - BARC ने अणुविज्ञानाच्या क्षेत्रात संशोधक आणि तज्ज्ञ तयार करण्यास मदत केली. त्यामुळे भारतात उच्च दर्जाचे वैज्ञानिक मनुष्यबळ विकसित झाले.

थोडक्यात BARC मुळे भारताच्या अणुविज्ञान, अणुऊर्जा आणि वैज्ञानिक स्वावलंबनासह तंत्रज्ञानाचा पाया मजबूत झाला. भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाला वैज्ञानिक आधार मिळाला. अणुविज्ञानाच्या क्षेत्रात भारताची क्षमता वाढली. ऊर्जा, वैद्यकीय व औद्योगिक क्षेत्रात अणुतंत्रज्ञानाच्या वापराला चालना मिळाली.

आयआयटी (भारतीय तंत्रज्ञान संस्था)

(IIT - Indian Institutes of Technology)

पहिली IIT १९५१ मध्ये खडगपूर येथे स्थापन झाली. त्यानंतर १९५८ मध्ये मुंबई, १९५९ मध्ये मद्रास व कानपूर तर १९६१ मध्ये दिल्ली येथे IIT ची स्थापना झाली. भारताला उच्च

दर्जाचे तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षण उपलब्ध करून देणे हा या IIT स्थापनेमागील उद्देश होता. उच्च दर्जाचे तांत्रिक शिक्षण, अभियांत्रिकी संशोधन, वैज्ञानिक मनुष्यबळ तयार करणे, औद्योगिक विकासासाठी तज्ज्ञ निर्माण करणे, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनविणे यासाठी स्थापन झालेल्या या IIT चे योगदान मोलाचे आहे.

IIT कार्याचे महत्त्व व योगदान -

१. उच्च दर्जाचे तांत्रिक शिक्षण - स्वातंत्र्यानंतर भारताच्या औद्योगिकीकरणासाठी प्रशिक्षित अभियंते आणि तंत्रज्ञांची आवश्यकता होती. IIT संस्थांनी उच्च दर्जाचे अभियांत्रिकी व तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून दिले.

२. औद्योगिकीकरणाला मनुष्यबळ - कारखाने, धरणे, वीज प्रकल्प, यंत्रनिर्मिती आणि इतर औद्योगिक क्षेत्रांसाठी कुशल अभियंते आवश्यक होते. IIT मधून प्रशिक्षित झालेले विद्यार्थी या विकास प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू लागले.

३. संशोधनाला प्रोत्साहन - IIT मध्ये शिक्षणाबरोबरच वैज्ञानिक व तांत्रिक संशोधनाला महत्त्व देण्यात आले. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान आणि नवकल्पनांच्या विकासाला चालना मिळाली.

४. वैज्ञानिक दृष्टिकोन - IIT मधील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये तर्कशुद्ध विचार, प्रयोगशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला. हे आधुनिक राष्ट्रनिर्मितीसाठी महत्त्वाचे होते.

५. तांत्रिक स्वावलंबन - औद्योगिक आणि तांत्रिक क्षेत्रात परदेशी तज्ज्ञांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत तज्ज्ञांची निर्मिती झाली.

थोडक्यात IIT ने भारताच्या तांत्रिक शिक्षणाचा दर्जा उंचावला. भारताच्या तांत्रिक आणि वैज्ञानिक मनुष्यबळाच्या निर्मितीत मोठी भूमिका बजावली. औद्योगिकीकरणाला आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध झाले. विज्ञान व अभियांत्रिकी संशोधनाला चालना मिळाली. भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासाला दीर्घकालीन आधार मिळाला.

युजीसी (विद्यापीठ अनुदान आयोग)

(UGC - University Grants Commission)

१९५३ मध्ये UGC ची स्थापना होऊन १९५६ मध्ये UGC ला वैधानिक दर्जा मिळाला. विद्यापीठीय शिक्षणाचा विकास, विद्यापीठांना आर्थिक मदत, उच्च शिक्षणाचा दर्जा राखणे,

शिक्षणाच्या मानकांचे समन्वयन करणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे या उद्दिष्टासाठी या संस्थेची निर्मिती करण्यात आली आहे.

UGC कार्याचे महत्त्व व योगदान -

१. उच्च शिक्षणाचा विस्तार - स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासासाठी उच्च शिक्षित मनुष्यबळाची गरज होती. UGC ने विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या विकासाला मदत करून उच्च शिक्षणाचा विस्तार करण्यास हातभार लावला.

२. विद्यापीठांना आर्थिक मदत - उच्च शिक्षण संस्थांना पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि संशोधनासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे हे UGC चे महत्त्वाचे कार्य आहे.

३. शिक्षणाचा दर्जा - उच्च शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक मानके निश्चित करण्याचे कार्य UGC करते. त्यामुळे विविध विद्यापीठांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेत सुसूत्रता आणण्यास मदत झाली.

४. संशोधनाला प्रोत्साहन - संशोधनासाठी अनुदान आणि विविध शैक्षणिक उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यामुळे भारतात संशोधनाची संस्कृती विकसित होण्यास मदत झाली.

५. राष्ट्रीय विकासासाठी मनुष्यबळ - उच्च शिक्षणाचा विस्तार झाल्यामुळे विज्ञान, कला, वाणिज्य, तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध झाले.

थोडक्यात UGC मुळे भारतातील उच्च शिक्षणाच्या विकासासाठी राष्ट्रीयस्तरावर संस्थात्मक व्यवस्था निर्माण झाली आहे. विद्यापीठांच्या विकासासाठी आर्थिक मदत उपलब्ध झाली. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मदत झाली. उच्च शिक्षण व संशोधनाला चालना मिळाली.

आयआयएम (भारतीय व्यवस्थापन संस्था)

(IIM - Indian Institutes of Management)

भारतामध्ये आधुनिक व्यवस्थापन शिक्षणाची सुरुवात करण्यासाठी IIM संस्थांची निर्मिती करण्यात आली. १९६१ मध्ये कलकत्ता व अहमदाबाद IIM ची स्थापना झाली. उच्च दर्जाचे व्यवस्थापन शिक्षण, उद्योग व व्यवसाय क्षेत्रासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे, व्यवस्थापन संशोधनाला प्रोत्साहन, आधुनिक व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा विकास साधने हा या संस्थेचा उद्देश होता.

IIM कार्याचे महत्त्व व योगदान -

१. उच्च दर्जाचे व्यवस्थापन शिक्षण - औद्योगिकीकरण आणि सार्वजनिक क्षेत्राच्या विस्तारामुळे उद्योग व संस्थांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशिक्षित व्यवस्थापकांची गरज निर्माण झाली. IIM ने उच्च दर्जाचे व्यवस्थापन शिक्षण सुरू केले.

२. उद्योग क्षेत्रासाठी तज्ज्ञ - उद्योग, व्यापार, बँकिंग आणि इतर संस्थांमध्ये नियोजन, उत्पादन, वित्त आणि मनुष्यबळ व्यवस्थापन करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार झाले.

३. आधुनिक व्यवस्थापन पद्धती - पाश्चात्त्य व्यवस्थापन तंत्रांचा अभ्यास करून त्यांचा भारतीय परिस्थितीनुसार उपयोग करण्यास प्रोत्साहन मिळाले.

४. संशोधन व सल्लागार कार्य - व्यवस्थापनाच्या विविध समस्यांवर संशोधन करून उद्योग व संस्थांना अधिक कार्यक्षम बनविण्यास मदत झाली.

५. आर्थिक विकासाला हातभार - कार्यक्षम व्यवस्थापनामुळे उद्योगांची उत्पादकता, नियोजन आणि निर्णयक्षमता सुधारण्यास मदत झाली. परिणामी आर्थिक विकासाला चालना मिळाली.

थोडक्यात IIM मुळे भारतातील व्यवस्थापन शिक्षणाचा पाया मजबूत झाला. भारतात आधुनिक व्यवस्थापन शिक्षणाला चालना मिळाली. उद्योग व व्यापार क्षेत्रासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण झाले. व्यवस्थापन संशोधनाचा विकास झाला. आर्थिक विकासासाठी आवश्यक व्यवस्थापन कौशल्ये विकसित झाली.

एम्स (अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था)

(AIIMS - All India Institute of Medical Sciences)

उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण, वैद्यकीय संशोधन, आधुनिक आरोग्यसेवा, तज्ज्ञ डॉक्टरांची निर्मिती व वैद्यकीय क्षेत्रात संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने १९५६ मध्ये **अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेची स्थापना करण्यात आली.**

AIIMS कार्याचे महत्त्व व योगदान -

१. उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण -भारतामध्ये जागतिक दर्जाचे वैद्यकीय शिक्षण उपलब्ध करून देणे हा AIIMS चा प्रमुख उद्देश होता. त्यामुळे गुणवत्तापूर्ण डॉक्टर आणि वैद्यकीय तज्ज्ञ तयार होण्यास मदत झाली.

२. वैद्यकीय संशोधन - विविध आजार, उपचारपद्धती आणि वैद्यकीय तंत्रज्ञान यावर संशोधन करण्याला AIIMS ने चालना दिली. त्यामुळे भारतीय वैद्यकीय क्षेत्राची संशोधनक्षमता वाढली.

३. आधुनिक आरोग्यसेवा - रुग्णांना आधुनिक आणि विशेष वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात AIIMS ने महत्त्वाची भूमिका बजावली.

४. तज्ज्ञ मनुष्यबळ - डॉक्टर, परिचारिका आणि इतर वैद्यकीय क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यास संस्थेने मदत केली.

५. आरोग्य क्षेत्राचे आधुनिकीकरण - आधुनिक वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि उपचारपद्धतींच्या विकासामुळे भारतातील आरोग्यसेवा अधिक आधुनिक बनण्यास मदत झाली.

थोडक्यात AIIMS ने भारतातील वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा उंचावला. वैद्यकीय संशोधनाला चालना मिळाली. उच्च दर्जाच्या आरोग्यसेवेची सुविधा विकसित झाली असून भारताच्या वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्यसेवेच्या आधुनिकीकरणाला चालना दिली आहे.

डीआरडीओ (संरक्षण संशोधन आणि विकास संस्था)

(DRDO - Defence Research and Development Organisation)

संरक्षण क्षेत्रातील विविध संशोधन संस्थांचे एकत्रीकरण करून डीआरडीओ ची स्थापना १९५८ मध्ये करण्यात आली. यामागे संरक्षण तंत्रज्ञानाचा विकास, लष्करासाठी आधुनिक उपकरणांची निर्मिती, संरक्षण संशोधनाला चालना, देशाची संरक्षणक्षमता वाढविणे, परदेशी तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करणे हा मागील उद्देश होता.

डीआरडीओ कार्याचे महत्त्व व योगदान -

१. संरक्षण संशोधन - भारताच्या संरक्षणासाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्याच्या उद्देशाने DRDO ची स्थापना करण्यात आली. संरक्षण संशोधनाला एकत्रित संस्थात्मक दिशा मिळाली.

२. स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान - संरक्षण उपकरणांसाठी परदेशावर अवलंबून राहण्याऐवजी देशांतर्गत संशोधन व विकासाला प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे आत्मनिर्भरतेचा पाया मजबूत झाला.

३. आधुनिक संरक्षण साधने - लष्करासाठी विविध प्रकारची संरक्षण उपकरणे, प्रणाली आणि तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संशोधन केले जाते. त्यामुळे संरक्षण दलांची तांत्रिक क्षमता वाढण्यास मदत झाली.

४. वैज्ञानिक मनुष्यबळ - संरक्षण क्षेत्रातील संशोधनासाठी वैज्ञानिक, अभियंते आणि तंत्रज्ञ तयार झाले. यामुळे संरक्षण संशोधनाची देशांतर्गत क्षमता वाढली.

५. राष्ट्रीय सुरक्षेला बळ - स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानामुळे देशाच्या संरक्षण क्षमतेत वाढ झाली. दीर्घकालीन दृष्टीने राष्ट्रीय सुरक्षेसाठी हे महत्त्वाचे ठरले.

थोडक्यात DRDO ने भारताच्या स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीकरणाचा पाया घातला आहे. भारताच्या संरक्षण संशोधनाला संस्थात्मक आधार मिळाला.स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाच्या विकासाला चालना मिळाली.परदेशी तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करण्यास मदत झाली.भारताची संरक्षणक्षमता वाढण्यास दीर्घकालीन मदत झाली.

इ) परराष्ट्र धोरण - अलिप्ततावादी चळवळ, भारत - चीन संबंध, भारत - पाकिस्तान संबंध

इ) परराष्ट्र धोरण - अलिप्ततावादी चळवळ, भारत - चीन संबंध, भारत - पाकिस्तान संबंध

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जागतिक राजकारणातील भारताच्या संदर्भातील पुर्वीचे सर्व संदर्भ बदलले. वेगवेगळया राष्ट्र व त्यांच्या गटांशी भारत कसे संबंध ठेवणार यावर परराष्ट्र धोरण अवलंबुन होते. अर्थात स्वातंत्र्य आंदोलन काळातच भारताची भूमिका तयार होत गेली. राष्ट्रीय नेत्यांनी ती वारंवार मांडलीही होती. पं. नेहरूंची भूमिका विशेष महत्त्वाची ठरली. १९४४ मध्येच नेहरूंनी भारताची परराष्ट्रनीती अलिप्ततेवर आधारीत असेल असे जाहीर केले होते.

भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे

- आपल्या प्रादेशिक अखंडत्वाचे व अबाधित्वाचे सरंक्षण करणे. हे प्रथम उद्दिष्ट होते.
- स्वातंत्र्य मिळाले तेव्हा लष्करी व आर्थिक दौर्बल्य होते. विकासासाठी प्रगत राष्ट्रांकडून भांडवल तंत्रज्ञान मदतीची गरज होती. व हे सर्व शांततेच्या काळात शक्य होते. म्हणून शांतता आवश्यक असल्याने जागतिक शांतता टिकवत आतंरराष्ट्रीय सहकार्य वृध्दीसाठी प्रयत्न करणे हे दुसरे उद्दिष्ट होते.
- विकासासाठी भांडवलशाही व साम्यवादी दोन्ही गटांशी मैत्री टिकविणे आवश्यक होते. त्यामुळे सर्व राष्ट्रांशी मैत्री व सहकार्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट होते.
- भारताने पारतंत्र्याचा अनुभव घेतला होता. साम्राज्यवाद वसाहतवाद वंशवर्णभेद यांचे निर्मुलन व्हावे. त्यातून होणारा अन्याय थांबावा. या घातक प्रवृत्ती मानवी जीवनातून समूळ नष्ट व्हाव्यात हे उद्दिष्ट होते.
- पारतंत्र्यातील लोकांच्या स्वातंत्र्य लढयास प्रोत्साहन देणे. बडया राष्ट्रांच्या हेव्यादाव्याच्या राजकारणात न पडणे. व भारताचे हितसंबंध सुरक्षित राखणे अशी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती.

अलिप्ततेचे धोरण

परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यास अलिप्ततेच्या धोरणाचा भारताने स्वीकार केला. १९४६ ,मध्ये हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून नेहरूंनी केलेल्या भाषणात भारताच्या परराष्ट्र धोरणाची बीजे दिसतात. नेहरू म्हणाले होते "कोणत्याही राष्ट्राच्या प्रभावाखाली आम्हाला राहावयाचे नाही. सर्व राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याची व जागतिक शांतता व स्वातंत्र्या करिता सर्व राष्ट्रांशी सहकार्य करण्याची आमची इच्छा आहे." याच भूमिकेतून अलिप्ततावादी धोरण आकाराला आले. कुठल्याही एका गटात न जाता सर्वांशी सलोखा राखणे म्हणजेच अलिप्ततावाद होय.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जग दोन गटात विभागले गेले होते. भांडवलशाही गट अमेरिका तर साम्यवादी गट रशिया नेतृत्त्वात कार्य करत होता. दोन्ही गट विस्तारवादी होते. दोघांमध्ये शीतयुध्द सुरू होते. त्यातून परस्परविरोधी नाटो सीटो सेंटो व वार्सा सारख्या लष्करी संघटना स्थापन झाल्या होत्या. जगातील सर्व राष्ट्रे दोन्ही पैकी एका गटात सामिल होत होती.

लोकशाहीवादी राष्ट्रे प्रामुख्याने अमेरिका तर समाजवादी राष्ट्रे रशिया कडे जात होती. नव्याने स्वातंत्र्य मिळालेली राष्ट्रे एका गटात सामिल होणे आवश्यक मानत होती. एका गटात सामिल झाल्यावर आपोआप दुसया गटाचे शत्रुत्व येत होते.

भारताला कुणाचे शत्रुत्व नको होते. कुणाच्या वर्चस्वातही रहायचे नव्हते. स्वत:चा विकास साधायचा होता. शक्य तेथुन मदत मिळवायची होती. जागतिक शांतता टिकवायची होती. त्यामुळे पहिल्यांदा भारताने व त्यापाठोपाठ स्वतंत्र झालेल्या काही राष्ट्रांनी कोणत्याही गटात न जाता अलिप्त रहायचे ठरविले. त्यातून अलिप्ततावादी राष्ट्रांचा तिसरा गट तयार झाला. भारताला असा गट निर्माण करायचा नसला तरी तो आपोआप तयार झाला.

अलिप्ततावादी गट लष्करीदृष्टया दुर्बल असला तरी त्यांची संख्या प्रदेशविस्तार व लोकसंख्या लक्षात घेणे बडया सत्तांनाही भाग पडले. नेहरूंमुळे हे धोरण विशेष लोकप्रिय झाले. व अलिप्ततावादी राष्ट्रांचे नेतृत्त्व भारताकडे आले.

भारताच्या अलिप्ततावादी धोरणाची वैशिष्टये

१) **कोणत्याही लष्करी करारापासून दुर**

अमेरिका किंवा रशियाच्या कोणत्याही लष्करी करारात भारत सहभागी झाला नाही. गटातील एका वर हल्ला झाल्यास ते गट गटातील सर्वांवरील हल्ला असल्याचे मानत. व गटातील एकमेकास मदत करत. अशा करारामुळे युध्दाचा धोका व युध्दक्षेत्राचा विस्तार वाढू शकतो म्हणून भारताने कोणत्याही लष्करी करारापासून दुर राहण्याचे ठरविले.

२) **परराष्ट्र धोरण ठरविण्याचे स्वातंञ्य**

कोणत्याही गटाशी स्वत:ला बांधुन न घेता परराष्ट्र धोरण स्वत:च्या मतानुसार ठरविण्याचे स्वातंञ्य टिकवणे हे ही वैशिष्टय आहे. बडया राष्ट्राचे बाहुले न बनता स्वइच्छेन निर्णय घेण्याचे स्वातंञ्य भारतास अलिप्ततावादी धोरणानुसार मिळाले. त्यामुळे राष्ट्रहीत जोपासणे शक्य होणार होते.

३) सर्वांशी मैत्री व सहकार्य धोरण

कोणत्याही गटातील राष्ट्रांशी मैत्री व सहकार्याचे संबंध अलिप्ततावादी धोरणानुसार विकसित करता येणार होते. शांतता टिकवणे व सर्व प्रगत राष्ट्रांकडून विकासासाठी मदत मिळवणे यामुळेच भारतास शक्य झाले.

४) अलिप्तता म्हणजे तटस्थता नाही

भारताची अलिप्तता म्हणजे तटस्थता किंवा निष्क्रियता नव्हती. स्वातंञ्यानंतर भारताने जवळजवळ सर्व स्वतंत्र राष्ट्रांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. युनोचा भारत सक्रिय सदस्य आहे. राष्ट्रकुलातही भारत आहे. आफ्रो आशियायी संघटनात भारताचे कार्य बहुमोल आहे. युध्द वर्णभेद ... अशा प्रश्नांवर बघ्याची भूमिका घेतलेली नाही. उत्तर कोरियाच्या आक्रमणाचा इजिप्तवरिल फ्रेंच हल्ल्याचा भारताने निषेध केला. युनोच्या मदतीस अनेक देशात शांतीसैन्य पाठविले.

थोडक्यात स्वातंञ्य जोपासत राष्ट्रीय हितानुसार आपले परराष्ट्र धोरण ठरवता यावे. वसाहतवाद वर्णवंशभेद उच्चाटन आशियाचे पुनरूत्थान जागतिक राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणे विकासासाठी सहकार्य मिळवणे यासाठी अलिप्ततावाद आवश्यक ठरला. पहिल्या दशकात अलिप्त राहणे शक्य आहे व आपले हेतू साध्य होतात हे स्पष्ट झाले. त्यामुळे नव्याने स्वतंत्र

झालेली राष्ट्रे भारताचे अनुकरण करू लागली. अमेरिका व रशियालाही महत्त्वाच्या मुद्दयावर भारताचा पाठिंबा आवश्यक वाटू लागला.

अलिप्ततावादी चळवळ व त्यातील भारताची भूमिका

१९५१-५३ दरम्यान अलिप्ततावाद हा कायम टिकणारा विचार असून तणाव काळात त्याची उपयुक्तता अमेरिका व रशियाला जाणवली. कोरियन युध्दकाळात भारताच्या अलिप्ततावादाचे व्यवहार्य स्वरूप व जागतिक शांतता टिकविण्यास उपयुक्तता जगाला लक्षात आली. कोरिया प्रकरणावरून युनोत भारताने मांडलेला युध्दबंदीचा ठराव पास झाला. त्यामुळे भारताच्या अलिप्ततेच्या धोरणाच्या उपयुक्ततेबद्दल अनेकांना विश्वास वाटू लागला. भारताप्रमाणेच इजिप्त युगोस्लाव्हियाची भूमिका असल्याने अलिप्ततावाद्यांचा गट प्रस्थापित होण्यास मदत झाली. पुढे त्यात अनेक नवस्वतंत्र राष्ट्रे सहभागी झाली.

१९५० नंतर अलिप्तता जागतिक राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्टय ठरले पण अलिप्ततावाद्यांची निश्चित युती निर्माण झालेली नव्हती. भारतानेही तिसरा गट संघटनास जाणीवपूर्वक प्रयत्न केला नाही. कारण त्यातून स्वातंत्र्याला मर्यादा पडतील असे भारताचे मत होते. शांततेचे क्षेत्र निर्माण करावे पण त्यासाठी कोणतेही दडपण नको असे भारताचे मत होते. अर्थात या धोरणाचे जनकत्व व नेतृत्त्व भारताकडे आले. सुरूवातीस आशियायी व अरब राष्ट्रांचा या धोरणात असलेला सहभाग पुढे विस्तारत गेला.

युगोस्लाव्हिया व इजिप्तचा पाठिंबा

युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटोंचे १९४८ मध्ये रशियाशी तीव्र मतभेद झाले. पण स्वातंत्र्य टिकवण्यास विचारधारा व भौगोलिक स्थितीमुळे पाश्चात्त्य गटांशीही त्यांचा दुरावा होता. त्यामुळे ते अलिप्ततावादाकडे वळले. त्यांनी १९५४ मध्ये भारतास भेट दिली. नेहरू व टिटोंनी शांततेचे क्षेत्र व्यापक होण्याच्या आवश्यकतेवर संयुक्त निवेदनाद्वारे भर दिला. १९५५ मध्ये नेहरूंनी युगोस्लाव्हियास भेट दिली. अनेक महत्त्वाच्या मुद्दयावर संयुक्त निवेदन प्रसिध्द करण्यात आले.

इजिप्तचे नासेर यांचाही याचकाळात नेहरूंशी निकटचा संबंध आला. १९५५ मध्ये कैरो येथे दोघांची भेट झाली. लष्करी करारात सामील न होण्याचे निवेदन यावेळी काढण्यात आले. नेहरू

नासेर टिटो असा प्रभावी गट आतंरराष्ट्रीय राजकारणात उभा राहिला. तिघाची १९५६ जुलैत ब्रिओनी बेटावर परिषद झाली. तीन खंडातील तीन अलिप्ततावादी देश एकत्र आले. त्यांनी चर्चा करून आतंरराष्ट्रीय प्रश्नांवर निवेदन काढले. अलिप्ततावादी चळवळ व्यापक होऊ लागली.

बेलग्रेड परिषद

अलिप्ततावादी राष्ट्रांना एकत्र आणून त्यांना प्रतिष्ठा मिळवुन देण्यास डिसेंबर १९६१ मध्ये युगोस्लाव्हिया राजधानी बेलग्रेड येथे परिषद भरली. टिटो व नासेर यांनी निवेदनाद्वारे अलिप्ततावादाचे स्वरूप स्पष्ट केले. नेहरूंच्या कल्पनेला व्यापकरूप देत अलिप्ततावादाची व्याख्या करण्यात आली. अलिप्ततावादी चळवळीची वैशिष्टे ही स्पष्ट करण्यात आली.

१९६० पर्यंत रशियाकडून भारताच्या अलिप्ततावादी धोरणास पाठिंबा मिळाला होता. १९६१ मध्ये अमेरिका राष्ट्राध्यक्ष केनेडीनीही त्यास मान्यता दिली. यानंतर ही चळवळ मोठयोप्रमाणात फोफावली. बेलग्रेड परिषदेस २५ देश उपस्थित होते. यानंतर सदस्यसंख्या वाढतच गेली. कैरो परिषदेस ४७ देश उपस्थित होते. पुढे ही संख्या शंभरावर गेली.

पंचशील तत्त्वांचा पुरस्कार

आतंरराष्ट्रीय शांतता व सहकार्य वाढीसाठी भारताने पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे

१) परस्परांच्या प्रादेशिक अखंडत्वाचा व सार्वभौमत्वाचा आदर राखणे.

२) कोणत्याही कारणा करिता परराष्ट्रावर आक्रमण न करणे.

३) परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

४) परस्परांना हितावह होईल असा समानतेचा व्यवहार करणे.

५) शांततामय सहजीवनाला मान्यता देणे.

वरील तत्त्वे राष्ट्रांच्या परस्पर संबंधांना आधारभूत ठरावी अशी कल्पना होती. या तत्त्वांनुसार भारत व चीन यांच्यात एप्रिल १९५४ मध्ये तिबेट संबंधी करार झाला. सप्टेंबर १९५४ मध्ये इंडोनेशिया प्रधानमंत्री सन्मानार्थ भोजनप्रसंगी नेहरूंनी भाषणात पंचशीलची मांडणी केली.

आ^क्टोबर १९५४ मध्ये व्हिएतनाम अध्यक्ष हो ची मिन्ह व डिसेंबर १९५५ मध्ये युगोस्लाव्हियाने पंचशील तत्त्वास मान्यता दिली. ब्रह्मदेश, लाओस, कंबोडिया यांनीही पंचशीलास आपला पाठिंबा जाहीर केला. एप्रिल १९५५ मध्ये दिल्ली येथील आशियाई देशांच्या परिषदेस २०० प्रतिनिधी हजर होते. सर्वांनी या तत्त्वांचा आतंरराष्ट्रीय शांतता व सहकार्य वाढंण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला.

एप्रिल १९५५ मध्ये नव्याने स्वतंत्र झालेल्या आशियायी आफ्रिकी देशांची इंडोनेशियातील बांडूग येथे परिषद साम्राज्यवाद विरोधी परिषद झाली. त्यात नेहरूंचे मोठे योगदान होते. २९ देश त्यात सहभागी झाले. साम्राज्यवादाचा निषेध करत स्वातंञ्यवादी राष्ट्रांना त्यासाठी आवाहन करत युरोपीयनाविषयी द्वेष भावना नसल्याचेही जाहीर केले. पंचशीलला मान्यता देऊन मूलभूत मानवी हक्कांचा सन्मान राखला जावा व आतंरराष्ट्रीय वाद शांततेच्या मार्गाने सोडवावेत ही दोन तत्त्वे जोडण्यात आली. शेवटी एक जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. आ^स्ट्रेरलिया आ^स्ट्रिया व पोलंडनेही १९५५ मध्ये पंचशीलला मान्यता दिली.

युध्दाच्या भयानकतेची जाणीव सर्वांना असल्याने शांतता सर्वांना हवी होती. त्यामुळे पंचशीलला सर्वांची मान्यता मिळेल व सर्व देश त्याप्रमाणे वागतील अशी अपेक्षा होती. अर्थात पंचशीलानुसार वागणे यासाठी कोणतीही बंधनकारक यंत्रणा नव्हती. पण लोकांना वाटणारी शांततेची गरज त्यातून दिसून येत होती.

१९५५ मधील बांडूग परिषदेनंतर अलिप्त चळवळीने जोर धरला. अलिप्त देशांची संख्याही वाढली. पण चीनने पंचशील मोडत १९६२ मध्ये भारतावर आक्रमण केले. व भारतीय प्रदेश बळकावला. इंग्लंड अमेरिकेने भारतास मदत केली. रशियाने साम्यवादी असूनही चीनचे समर्थन केले नाही. पण या युध्दामुळे लष्करी ताकद वाढविण्याची गरज भारतास जाणवली. अलिप्ततावाद व पंचशीलास धक्का लागु न देता भारताने राष्ट्रहीतास आवश्यक बदल घडविण्यास सुरूवात केली.

भारत चीन संबंध

चीनी यात्रेकरू पवासी अभ्यासक प्राचीानकाळापासून भारतात येत पण दोन्ही देशात फार मैत्री नव्हती. पारतंञ्यकाळात मात्र दोघांत मैत्री होती. १९२४ मध्ये रविंद्रनाथ टागोर यांनी चीनला भेट दिली. १९४२ मध्ये चँग कै शेक यांनी भारतास भेट दिली. दुसया महायुध्दात मदत मिळविण्यास भारतीयांना सुधारणा दयाव्यात असा इंग्रजांवर दबाव आणला. त्यामुळे इंग्रजांनी क्रिप्स मिशन भारतात पाठवले. १९४४ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांनी चीनला भेट देऊन दोन्ही देशातील सांस्कृतिक संबंधाचा गौरव केला. १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती होऊन गणराज्य स्थापन झाले. त्यास सर्वप्रथम भारताने मान्यता दिली. भारत चीनच्या एकत्रित प्रयत्नातून आशियाला जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळेल असा नेहरूंचा विश्वास होता. युनोच्या सुरक्षा समितीत चीनला सदस्यत्व मिळण्यास भारताने प्रयत्न केले.

भारत चीन करार

२९ एप्रिल १९५४ रोजी बीजिंग येथे भारत व चीन मध्ये मैत्री करार झाला. भारताचे पंतप्रधान पंडीत नेहरू व चीनचे पंतप्रधान चाऊ एन लाय यांनी करारावर सही केली. या कराराच्या प्रास्ताविकात दोन्ही देशाचे संबंध कशावर आधारित असतील हे सांगणारी पाच तत्त्वे जाहीर केली होती. ही पाच तत्त्वे पंचशील म्हणून प्रसिद्ध आहेत.

१) परस्पर देशांच्या प्रादेशिक अखंडतेला व राजकीय सार्वभौमत्वास मान्यता देणे.

२) कोणीही कोणावर आक्रमण न करणे.

३) एकमेकांच्या अंतर्गत बाबतीत हस्तक्षेप न करणे.

४) एकमेकांविषयी समभाव बाळगणे व परस्परांच्या हिताची जपणूक करणे.

५) शांततामय सहअस्तित्व.

या पंचशीलवर भारत चीन संबंध आधारित होते.

तिबेट प्रश्नावरून भारत चीन संबंधाला तडा

१९५० मध्ये भारतास विश्वासात न घेता चीनने तिबेटचा ताबा घेतला. पण नेहरूंनी चीनच्या तिबेट वरील हक्कास हरकत घेतली नाही. २१ एप्रिल १९५४ रोजी करार करून भारताने चीनचा तिबेट वरिल हक्क मान्य केला. बांडूग परिषेद पूर्वी जुन १९५४ मध्ये चीनी पंतप्रधान चौ एन लाय भारत भेटीस आले. पंचशील तत्त्वांबाबत चर्चा होऊन हिंदी चीनी भाई भाई नारा देण्यात आला.

बांडूग परिषदेतील पंचशीलाचा चीनने स्वीकार केला. पंचशीलानुसार दोन्ही देशांनी संबंध ठेवण्याचे मान्य केले. संबंध घनिष्ठ झाले. शांततापूर्ण सहजीवनाचा पुरस्कार करण्यात आला. व आशियायी राजकारणात एक नवे पर्व सुरू झाले.

१९५४ च्या कराराचा चीनने भंग केला. बारहोती येथे भारताच्या असलेल्या सैन्याचा निषेध चीनने केला. भारताने त्याकडे दुर्लक्ष केले. चिनने बारहोती येथे लष्करी छावणी स्थापन केली. अशा घटनांमुळे भारत चिंताक्रांत झाला. चीन मध्ये नकाशात ५०००० चौ. मैलाचा भारतीय प्रदेश चीनचा दाखविण्यात येऊ लागला. नेहरूंनी ५४ मध्ये चिन दौरा प्रसंगी हा प्रश्न मांडला तेव्हा चीनी नेत्यांनी विषयास बगल दिली.

बारहोती येथील भारतीय टेहळणी पथकास चीनीसैनिकांनी आव्हान दिले. एप्रिल ५६ मध्ये निलंग खिंडीच्या प्रदेशात प्रवेश केला. शिपकी खिंडीतून चीनी सैन्य भारतीय हद्दीत घुसले. भारतीय सैन्यास वारंवार त्रास देण्यात येऊ लागला. भारताने तरी लष्करी कारवाई न करता पत्राद्वारे विरोध कळवला. नोव्हेबर ५६ व पुन्हा ५७ मध्ये चौ एन लाय भारत भेटीस आले. सीमेबाबत दोन्ही देशात वाद नाहीत अस्ेा जाहीर करण्यात आले. व असलेले प्रश्न सामोपचाराने सोडवायचे ठरले. तर दुसया बाजूस चीनी घुसखोरी सुरूच होती. भारताच्या अक्साई चीन मधून चीनने तिबेट मध्ये जाण्यास रस्ता बांधला. चिनने विश्वासघात करूनही निषेध नोंदविण्या पलिकडे भारताने काही केले नाही. १९५८ मध्ये ६००० चौ. मै. भारतीय प्रदेश चीनने बळकावला. जुलै ५८ मध्ये पूर्व लडाखातील खुर्नाक किल्ला चीनने व्यापला. स्पान्गरला छावणी टाकून तेथील भारतीय सैनिकांना अटक केली. २६ सप्टेबर १९५९ रोजी नेहरूंनी कडक निषेध व्यक्त केला पण चीनने कारवाया चालू ठेवत २१ आ^क्टोबर ५९ मध्ये कोंगका खिंडीत चकमक झाली. भारताच्या ईशान्य सीमेवर नेफा विभागातही गंभीर चकमकी झाल्या. नेफा सीमेवरील सुबान्सरी विभागातील लोंगजू भारतीय चौकीवर चीनने उघड हल्ले केले. तेव्हा लोगंजू प्रकरण चीनचे हेतुपुरस्सर आक्रमण असल्याचे भारतीय वकीलातीने

चीनला कळविले. तर नेहरूंनी नेफा सीमा संरक्षण जबाबदारी आसाम रायफल्स ऐवजी भारतीय लष्कराकडे सोपविण्याचे जाहीर केले.

६ ऑक्टोबर १९५९ रोजी चीनने लडाख मध्ये भारतीय फौजेवर हल्ला केला. डिसेंबर मध्ये लडाखातील विवादास्पद प्रदेश तटस्थ ठेवण्याची चीनने भारतास सुचना केली. भारताने ती फेटाळली. मार्च ६० मध्ये दोन्ही देशांच्या नेत्यांची बैठक झाली. लाय त्यास हजर होते. चिन लडाख व नेफाच्या १५००० चौ. मै. वर हक्क सांगत होता त्यामुळे सिमा प्रश्नावर तडजोड झाली नाही. लोंगुझ खिनझेमेन स्पिती शिपकी निलंग व बारहोती प्रदेशावरही चीन हक्क सांगत होता. यामुळे दोन्ही देशातील संबंध दुरावत जाऊन युध्द झाले.

भारत चीन युध्द १९६२

तिबेट प्रश्न सिमावाद भारताची दमदार विधाने चीनी लष्करी कारवाईस तोंड देण्याबाबत भारताची लोकसभेतील आश्वासने सीमेवरील भारताचे वाढते सामथ्र्य तसेच चीनच्या वाढत्या लष्करी हालचाली व चीनला दक्षिण आशियाचे हवे असणारे नेतृत्त्व चिनचा विस्तारवाद चीन व रशियातील वाद अशा कारणांमुळे भारत चीन युध्द घडून आले

८ सप्टेंबर १९६२ रोजी थागला कडयाहून चीनी फौजा पुढे आल्या. अडीच मैल पुढे दक्षिणेला ढोला येथे त्यांनी पाय रोवले. भारताने निषेध नोंदवुन काही परिणाम न झाल्याने भारताने तोवांग येथून फौजा पुढे आणल्या. आ^क्टोबर मध्ये चकमकी होत राहिल्या. याचकाळात नेफा विभागात तयारी करून चीनने २० ऑक्टोबर रोजी हल्ला केला. व भारत चीन युध्दाला सुरूवात झाली.

खिन्झमेन व ढोला दोन्ही ठिकाणी भारताचा निभाव लागला नाही,. कामेंग सिमा विभागातील भारतीय लष्कराचाही पराभव झाला. एक महिन्या आत भारतीय तुकडयांना माघार घ्यावी लागली. म^कमोहन रेषेंपासून १५० मैलावर चीनी फौजा धडकल्या. तोवांग हे केंद्रही पडताना २४ आ^क्टोबर रोजी चीनने युध्दबंदीची सूचना मांडली. आहे त्या ठिकाणापासून २० कि. मी. मागे सरकण्याची चीनची सूचना होती. भारताने ती फेटाळली. त्यामुळे नोव्हेंबर मध्ये चीनची जोरदार आक्रमणे सुरू झाली. भारतानेही प्रतिकार केला. अमेरिका इंग्लंड रशियाकडे मदत मागितली. त्यांनीही मदत देऊ केल्याने चीनवर दबाव आला. २१ नोव्हेंबर ६२ रोजी चीनने एकतर्फी युध्दविराम जाहीर केला.

कोलंबो योजना

अक्साई चीन हा भारताचा प्रदेश काबीज करून चीनचा हेतू साध्य झाल्याने युध्दबिराम त्याने जाहीर केला. भारताने ८ सप्टैबर ६२ रोजी दोन्ही देशांचे सैन्य जेथे होते तेथपर्यंत माघार घेण्याची मागणी केली. अखेर श्रीलंकेने पुढाकार घेत १० डिसेंबर ६२ रोजी कोलंबो येथे आफ्रो आशियायी राष्ट्रांची परिषद आयोजित केली. त्यास इंडोनेशिया कंबोडिया ब्र*मदेश युनायटेड अरब घाना भारत चीन श्रीलंका देशांचे प्रतिनिधी हजर होते. या परिषदेत तयार करण्यात आलेली योजना कोलंबो योजना म्हणून ओळखली जाते. कोलंबो योजनेतील तरतुदी पुढील प्रमाणे ...

१) पश्चिम सीमा प्रदेशात चीन व भारताने उभारलेली लष्करी ठाणी उठवावीत.

२) भारत चीन सीमेजवळचा २० कि. मी. चा टापू निर्लष्करी म्हणून घोषित करावा.

३) पूर्व सीमा प्रदेशात म^कमोहन सिमारेषेपर्यंतचा प्रदेश भारताने व्यापावा.

४) युध्दबंदी वेळी चीनचे असणारे सैन्य भारत तिबेट सिमेपर्यंत मागे घ्यावे.

चीनने ही योजना मान्य केली नाही. त्यामुळे चीन व भारतात कोणताही सीमा करार झाला नाही. चीनने भारताचा काबीज केलेला प्रदेश भारतास परत दिला नाही.

भारताच्या पराभवाची कारणे

भारत चीन युध्दात भारताचा पराभव झाला. चीनने भारताचा ४०००० चौ. मै. चा प्रदेश व्यापला. भारताच्या या पराभवास अनेक घटक कारणीभूत होते. ते पुढीलप्रमाणे...

१) सरंक्षण समितीकडून राष्ट्राच्या सरंक्षणाचा गंभीरपणे विचार झाला नाही.

२) भारतात आर्थिक बाबतीत दुर्बल होता.

३) युध्द अनपेक्षितपणे लवकर सुरू झाले.

४) लष्कराच्या आधुनिकतेकडे दुर्लक्ष केले.

५) लष्करास युध्द साहित्याचा अपुरा पुरवठा

६) तुटपुंज्या असणाया दळणवळणाच्या सोयी.

७) वाहने जुन्या पध्दतीची होती. डोंगराळ भागात ती निरूपयोगी होती.

८) पर्वतमय प्ररदेशात लढण्याचे युध्द तंत्र प्रशिक्षण भारतीय सैन्यास मिळाले नाही.

९) चिनी डावपेच युध्दपध्दती शस्त्रसामग्री संख्याबळइ. चा भारतीयांना अंदाज आला नाही.

१०) भारतीय लष्करातील अधिकायात परस्पर विश्वास समन्वय व सहकार्याचा अभाव होता.

भारत चीन युध्दाचे परिणाम

१) सरंक्षण व्यवस्थेत बदल करून ती अधिक सुसज्ज ठेवण्यात येऊ लागली.

२) अंतर्गत राजकारणावर परिणाम होऊन काँग्रोसची लोकप्रियता कमी होऊ लागली.

३) नेहरू युगाच्या अस्ताला सुरूवात झाली.

४) आदर्शवादी तत्त्वनिष्ठेचा कालखंड संपून व्यवहारी व कठोर वास्तववादाच्या राजकारणाला सुरूवात झाली.

५) सरंक्षण मंत्री कृष्ण मेनन यांना राजीनामा देणे भाग पडले.

६) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताच्या प्रतिष्ठेवर आघात झाला.

७) भारतीय कम्युनिस्ट पक्षाबद्दल जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला.

८) भारताच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडला.

९) सरंक्षण खर्चात उत्तरोत्तर वाढ होत गेली.

१०) परकीय आक्रमण वेळी भारतीय जनता सर्व आपसी वाद गट विसरून एक झाली. हा चांगला परिणाम ही झाला.

या प्रमाणे भारत चीन युध्दाचे परिणाम दिसून येतात.

१९६२ नंतरचे भारत चीन संबंध

युध्दानंतर दोन्ही देशांचे संबंध दुरावले. सीमावाद आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे सोपविण्याची भारताची सूचना चीनने फेटाळली. भारताने चीनचा ६०००० चौ. मै. चा प्रदेश व्यापल्याचा १९६४ मध्ये चीनने आरोप केला. तसेच भारताचा शत्रू पाकशी १९६५ मध्ये मैत्री करार केला. पाकला युध्द साहित्य दिले. पूर्व ेपाक मधील पाकच्या अत्याचाराबद्दल अक्षरही काढले नाही. उलट पूर्व पाक मध्ये भारताने फुटीरता बीजे रोवल्याचा आरोप केला. ऑगस्ट १९७१ मध्ये भारत रशिया मैत्री करार झाल्यावर भारतावर हा लष्करी करार असल्याची टिका केली. ७१ च्या भारत पाक युध्दावेळी उघडपणे पाकला मदत केली. युनोत भारतविरोधी अमेरिकेच्या कारवायांना साथ दिली. चीनच्या कारवाया लक्षात घेता दोन्ही देशातील प्रश्न सामोपचाराने सुटावेत असे भारताने वारंवार सांगुनही चीनने त्याकडे दुर्लक्ष केले.

१९७६ पासून भारत चीन संबंधात बदल दिसू लागले. राजनैतिक प्रतिनिधींच्या देवाणघेवाणीचा दोघांनी निर्णय घेतला. सलोख्याच्या दृष्टीने हे पहिले पाऊल ठरावे असा आशावाद परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाणांनी व्यक्त केला. १९७७ मध्ये भारतात काँग्रेसचा पराभव होऊन जनता पक्ष सत्ता आल्याचे चीनने स्वागत केले. १९७९ मध्ये परराष्ट्रमंत्री वाजपेयींनी चीनला भेट दिली. पूढे १९८० मध्ये काँग्रेस सरकारनेही संबध सुधारण्यासाठी प्रयत्न केले. जून १९८१ मध्ये चीनचे उपपंतप्रधान व परराष्ट्रमंत्री भारत भेटीस आले. सामोपचाराने वाद मिटविण्याची तयारी दाखविली. अफगाणीस्तानातून रशियाने लष्कर मागे घ्यावे या चीनी मागणीस भारताने सहमती दाखविली. सीमावाद सोडविण्यास उच्चस्तरीय बैठकांचे आयोजन करण्याचे ठरले. तोपर्यंत सहकार्याचा मार्ग पत्करण्याचे ठरले. ऑक्टोबर १९८१ मध्ये वाटाघाटी सुरू झाल्या. नोव्हेंबर १९८५ मध्ये चीनी परराष्ट्र आर्थिक व्यवहार मंत्री भारत भेटी वेळी परस्पर व्यापारी संबंधाची व्याप्ती वाढविण्याचा व तांत्रिक देवाणघेवाणीबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार इंडियन चेबंर्स ऑफ कॉमर्सच्या प्रतिनिधींनी ८६ मध्ये चीनला भेट दिली. राजीव गांधींनीही चीनला भेट दिली.

आजही भारत चीन सीमावाद सुटलेला नाही. तरी शत्रूत्व ओसरून व्यापारी संबंध वाढत असल्याचे दिसते आहे.

भारत पाकिस्तान संबंध

जमातवादातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली. या दोघांत सुरूवाती पासून सलोख्याचे संबंध नव्हते नेहरूंपासून राजीव गांधींपर्यत दोन देशातील संबंध पुढील प्रमाणे...

५५ कोटींचा प्रश्न

स्वांतञ्यानंतर रिझर्व्ह बँकेत असलेल्या ३७५ कोटींपैकी ७५ कोटी पाकिस्तानातला द्यायचे होते. २० कोटी दिले व ५५ कोटी देणे बाकी होते. हे ५५ कोटी काश्मीर व निर्वासित प्रश्न समाधानकारक पणे सोडविल्यावर द्यायचे होते. पण पाकिस्तानने हे पैसे तातडीने मागितले. पाकिस्तान हे पैसे शस्त्र खरेदीसाठी वापरेल अशी भारतीय नेत्यांना भीती होती पण दोन देशातील संबंध सुधारावेत यासाठी महात्मा गांधीजीनी ५५ कोटी द्यावेत अशी भुमिका घेतली.

संस्थान प्रश्न

स्वांतञ्यानंतर जुनागढ व हैद्राबाद संस्थान प्रकरणात पाकिस्तानने हस्तक्षेप करत तेथील भारत विरोधी हालचालींना पाठिंबा दिला. जुनागढ मध्ये सार्वमतापुढे पाकिस्तानचे काही चालले नाही तर हैद्राबाद प्रश्न भारताने अत्यंत मुत्सद्देगिरीने सोडविला.

काश्मीर प्रश्न

स्वांतञ्यानंतर भारत व पाकिस्तानात शांतता नांदेल ही आशा फोल ठरली. व काश्मिर वरून दोघांचे संबंध बिघडले. संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा अधिकार होता. काश्मिर प्रांतात ७७ मुस्लिम व २४ टक्के हिंदु बौध्द शीख व इतर होते. भारत व पाकिस्तानच्या सीमेला लागुन असणाऱ्या काश्मिरच्या सीमा रशिया चीन व अफगाणीस्तानला मिळत होत्या. लष्करी व भौगोलिक दृष्टया हे राज्य महत्त्वाचे होते. काश्मिर भारतात विलीन व्हावे यासाठी सुरूवातीस भारताने काहीच प्रयत्न केले नाही. उलट त्यांनी पाकीस्तानात विलीन व्हायचे ठरविल्यास भारताला त्यात काही वावगे वाटत नव्हते. असा स्पष्ट निर्वाळा २८ ऑक्टोबर १९४७ रोजी कॅम्पबेल जॉन्सन यांनी दिला होता. जिना व धर्मवेडयांनाही काश्मिर पाकिस्तानात विलीन करून घ्यायचे होते. त्यांना ब्रिटिशांकडून सल्ला व मदत मिळत

होती. संस्थान पाकिस्तानात विलीनीकरणास राजावर त्यांनी प्रचंड दबाव आणला. हरिसिंग राजास भारतातील लोकशाही व पाकिस्तानातील धर्मवाद दोन्हींची भीती वाटत होती. स्वत:चे संस्थान स्वतंत्र ठेवायचे होते. पण तेथील राष्ट्रीय परिषद पक्ष व त्याचे नेते शेख अब्दुल्ला याना संस्थान भारतात सामील करावे असे वाटत होते. तर नेहरू पटेल यांना तेथे सार्वमत घेऊन कुठे सामील व्हायचे ते ठरवावे असे वाटत होते.

काश्मिर प्रश्नावरून युध्द

पाकिस्तानने काश्मिरी जनतेचा विचार न करता १९४७ मध्येच काश्मिर मध्ये घुसखोरी करून वर्चस्व निर्मितीस प्रयत्न सुरू केले. हिवाळयाच्या सुरूवातीस शेकडो पठाण काश्मिरमध्ये घुसले. व जलद गतीने राजधानी श्रीनगरकडे निघाले. पाक लष्करी अधिकारी अनधिकृतपणे त्यांचे नेतृत्व करत होते. राजा हरिसिंगाच्या सैन्यास अपयश येऊ लागताच त्याने भारताकडे मदत मागितली. पण काश्मिर भारतात औपचारिकरित्या सामिल झाल्यावरच मदत करत करता येईल हे माऊंटबॅटनने लक्षात आणून दिल्यावर पटेल शेख यांनीही औपचारिक विलीनीकरणाचा आग्रह धरला. अखेर २६ ऑक्टोबर रोजी हरिसिंगाने विलीनीकरणावर स्वाक्षरी केली. भारताने काश्मिर मध्ये शांतता सुव्यवस्था प्रस्थापित झाल्यावर तेथे सार्वमत घेण्यात येऊन निर्णय घ्यावयाचे ठरले. दरम्यान औपचारिक विलीनीकरणानंतर लष्करी मदत करण्यात आली. व घुसखोरांना श्रीनगर व काश्मिर खोऱ्यातून हाकलण्यात आले.

संयुक्त राष्ट्र संघटना व काश्मिर प्रश्न

भारत व पाक यात उघड युध्द होऊ नये. म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेत काश्मिर प्रश्न मांडण्याचे भारताच्या मंत्री मंडळाने ३० डिसेंबर १९४७ रोजी ठरविले. पण याबाबत पुढे नेहरूंना पश्चाताप करावा लागला. कारण सुरक्षा मंडळात इंग्लड अमेरिकेने काश्मिर प्रश्ना ऐवजी भारत पाक संघर्ष आपल्यापुढे आहे असा बदल करून घेत अनेक ठराव पास केले. व एका ठरावा नुसार ३१ डिसेंबर १९४८ रोजी दोघांनी युध्द विराम मान्य केला. युनोत भारतास न्याय मिळेल ही अपेक्षा व्यर्थ ठरली.

१९५१ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेत ठराव केला गेला की पाकीस्तान व्याप्त काश्मिरातून पाकने सैन्य मागे घेतल्यावर तेथे सार्वमत घ्यावे. पण या भागातून सैन्य मागे घेण्याचे पाकने नाकारले आहे.

काश्मिरच्या भारतातील विलीनीकरणानंतर घटनेच्या ३५० व्या कलमानुसार काश्मिरला विशेष राज्याचा दर्जा देण्यात आला. हळूहळु केंद्राचे राज्यातील अधिकार वाढविण्यात आले. १९५० पर्यंत नागरिकत्व मुलभूत अधिकार इ. बाबतीतील घटनेतील तरतुदी काश्मिरला लागु होत नव्हत्या. १९५१ मध्ये प्रौढ मताधिकारानुसार काश्मिरमध्ये घटना समितीची निवडणुक घेण्यात आली. या समितीने १९५४मध्ये भारतात सामिल होण्याचा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र काश्मिरमध्ये ही लागू करण्यात आले. १९७५ मध्ये भारत सरकार व काश्मिर यात करार होऊन काश्मिर मध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची तरतुर करण्यात आली. काश्मिर मुख्यमंञ्यास पूर्वी प्रधानमंत्री म्हटले जात असे त्यास इतर राज्यांप्रमाणे मुख्यमंत्री म्हणण्यात येऊ लागले.

१९६५ चे भारत पाक युध्द

काश्मिर घेता न आल्याने पाकिस्तान धुमसत होता. फाळणीमुळे पाणी वाटपाचा प्रश्न निर्माण झाला होता. विश्व बँक अध्यक्ष युनीन ब्लॅक पाणी वाटपाची योजना दोन देशांसमोर ठेवली. सप्टेंबर १९६० मध्ये दोन्ही देशांनी ती मान्य केली. पाकने या योजनेबाबत नापसंती व्यक्त करत भारताच्या बदनामीस सुरूवात केली. पाक प्रमुख आयुबखान यांनी भारत विरोधी आघाडीच उघडली. त्यामुळे दोन्ही देशात तणाव वाढत गेला. त्यातच पाकने चीनशी जवळीक केली. चीन भारत युध्दावेळी काश्मीर मिळवण्याचा प्रयत्न केला. सीमेवर लष्करी हालचाली वाढविल्या. काश्मीर मध्ये दंगली घडविण्याचा प्रयत्न केला. पण पाकचे मनसुबे पुर्ण झाले नाही.

१९६४ मध्ये दोन्ही देशात मैत्री होण्याची चिन्हे निर्माण झाली पण नेहरूंच्या मृत्यूमुळे करार होऊ शकला नाही. शास्त्री पंतप्रधान झाले तेव्हा ही पाक काश्मिर मिळवण्यास प्रयत्नशील होताच. आयुबखान भारताविरोधी प्रचार करत होतेच. त्यातच अमेरिकेकडून पाकला लष्करी मदत मिळाली. परीणामी कच्छ सीमेवर १९६५ मध्ये पाकने भारतावर आक्रमण केले. भारतीय सैन्य कच्छ कडे गेल्यावर काश्मिर घेण्याचा पाकचा डाव यशस्वी होऊ शकला नाही. काश्मिर सीमेवरही लष्करी हालचाली वाढवुन घुसखोर पाठविले भारतीय सीमेचा भंग केला. भारतीयांनीही प्रतिकार

करत हाजीपीर खिंडींपर्यंतचा प्रदेश काबीज केला. काश्मिर कडे येण्याचा पाकचा मार्ग बंद झाला. पण पाकच्या कारवाया थांबल्या नाहीत. १ सप्टेंबर १९६५ रोजी पाक सैन्य नैक्तत्य काश्मिरच्या अखनुर प्रदेशात शिरले. पण अखनुर जिंकण्यात पाकला अपयश आले.

भारतानेही तीन आघाडयांवर हल्ला करण्याची योजना आखली. ६ सप्टेबर रोजी भारतीय सेना लाहोर कडे निघाली. ८ सप्टेबर रोजी सियालकोटवर हल्ला केला. त्यामुळे पाकला काश्मिर मधील सैन्य मागे घ्यावे लागले. काश्मिरवरील पाक धोका संपला. २२ दिवस हे युध्द सुरू होते. शेवटी युनो मध्यस्थीने युध्द थांबले. युनोचे महासचिव यु थांट भारतात आले. शास्त्रींनी युध्दबंदीसाठी तीन अटी ठेवल्या. त्यानुसार पाकने युध्दाला सुरूवात केल्याचे मान्य करावे. तसेच पाकने सैन्य व घुसखोरांना मागे बोलवावे. तसेच पुन्हा आक्रमण करणार नाही अशी हमी दयावी. पाकने या अटी मान्य केल्या. २४ सप्टेबर रोजी युध्दबंदी झाली. यावेळी पाकव्याप्त काश्मिर धरून ७४० चौ. मै. चा प्रदेश भारताच्या ताब्यात २१० चौ. मै. चा प्रदेश पाकच्या ताब्यात होता.

रशियाचे पंतप्रधान कोसिजीन यांनी दोन्ही देशांच्या प्रमुखांशी पत्रव्यवहार करून दोघांना वाटाघाटीसाठी रशियात ताश्कंदला निमंत्रीत केले.

ताश्कंद करार

४ जानेवारी १९६६ रोजी ताश्कंदला बैठक सुरू झाली. ६ दिवस चर्चा झाली. वाटाघाटीतून कराराचा मसुदा तयार झाला. शेवटी १० जानेवारी रोजी इतिहासप्रसिध्द ताश्कंद करार झाला. या करारातील अटी पुढीलप्रमाणे...

१) भारत व पाक मध्ये शांततापूर्ण व मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित व्हावेत.

२) युध्दापूर्वी दोन्ही देशांच्या फौजा जेथे होत्या तेथे १५ फेब्रुवारी पर्यंत मागे घ्याव्यात.

३) जिंकलेला प्रदेश परस्परांना परत करावा.

४) निर्वासितांच्या प्रश्नावर दोघांनी विचार करून योग्य निर्णय घ्यावा.

५) परस्परांविरूध्द अपप्रचार करू नये.

६) काश्मिर प्रश्न वाटाघाटीने सोडवावा.

करारावर लालबहादुर शास्त्री व आयुबखान यांनी स*या केल्या. त्याच रात्री शास्त्रींची प्रकृती खालावली व हृद्यविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. ११ जानेवारी रोजी त्यांचे शव भारतात आणण्यात आले.

१९७१ चे भारत पाक युध्द

काश्मीरचे भारतात विलीनीकरण झाल्याचे भारताने अनेकदा स्पष्ट करूनही पाक त्यास मान्यता देत नव्हते. युध्दाने प्रश्न सोडविण्याचा पाकचा प्रयत्न होता. त्यातून १९७१ मध्ये युध्द उद्भवले. निर्वासितांना भारताने आश्रय दिल्याचे भांडवल करत पाक ने सिमेवर सैन्य जमवाजमव केली. काश्मिर व पंजाबातील सात शहरावर ३ डिसेंबर रोजी बा^म्ब हल्ला करून आक्रमक हालचाली सुरू केल्या. ३ डिसेंबर रोजी इंदिरा गांधी यांनीही देशाला उद्देशुन भाषण करत युध्दाचा निर्धार व्यक्त केला. युध्द सुरू झाले ते १६ दिवस चालले.

युध्दात भारताची दोन उद्दिष्टे होती. पश्चिम सिमेवर पाकला फक्त थोपवुन धरणे. आणि पूर्व सीमेवर मुसंडी मारत मुक्तीवाहिनीच्या मदतीने पाक लष्कराचा पराभव करणे थोडक्यात पूर्व ेपाक मधील जनतेच पाकच्या मगरमिठीतून सोडवणे हा भारताचा उद्देश होता. त्यानुसार आठ दिवसात पूर्व पाक मध्ये ढाक्यापर्यंत मजल मारली. १५ डिसेंबर रोजी पश्चिम सीमेवरही ४५ रणगाडे काबीज करत फाजिलका क्षेत्रात पाक सैन्याचा दारूण पराभव केला. पूर्व पाकमध्ये जनरल माणिकशाह यांनी पाक फौजांचा निर्णायक पराभव केला. ९३००० पाक सैनिक युध्द कैदी बनले. ९४ विमाने २६४ रणगाडे २ विनाशिका २ पाणबुडया नष्ट केल्या. १६ डिसेंबर पाक सैन्य अधिकारी नियाझी यांनी जनरल अरोरांसमोर ढाक्का रेसकोर्सवर जाहीररित्या दुपारी ४. ३०. वाजता शरणागती पत्करली.

पूर्व पाक मुक्त झाल्यावर १६ डिसेंबर रोजी रात्री इंदिरा गांधी यांनी अनपेक्षित एकतर्फी युध्दबंदी जाहिर केली. दुसया दिवशी या*याखान यांनी ती मान्य केली. अशा प्रकारे १९७१ च्या युध्दात भारताचा विजय झाला.

सिमला करार

८ जून १९७२ रोजी भुत्तो वाटाघाटीसाठी सिमल्यास आले. ६ दिवस चर्चेनंतर ३ जुलै रोजी करार झाला. त्यानुसार १९४८ ची भारत पाक सिमा दोन्ही देशांनी मान्य केली. १९७१ च्या युध्दाने

पाकची फाळणी होऊन बांग्लादेशाची निर्मिती झाली होती त्यास दोन्ही देशांनी मान्यता दिली. जगभरातून या कराराचे स्वागत झाले. भारतात विरोधी पक्षांनी मात्र करारावर मोठी टिका केली. काश्मिर सिमावाद निर्णय झाला नाही. युध्दखंडणी भारताने मागीतली नाही. फाळणीपूर्व कर्जाचा निर्णय केला नाही. निर्वासितांबद्दल नुकसानभरपाई मागितली नाही. विजयाचे सर्व फायदे भारताने सोडले. अशी टिका विरोधकांनी करत त्यास काळा करार संबोधले. अर्थात भविष्यात भारत पाक संबंध सुधारण्यासाठी हा करार करण्यात आला होता.

युध्दानंतरचे भारत पाक संबंध

युध्दा नंतर संबंध सुधारण्यास सौम्य स्वरूपाचा सिमला करार भारताने केला. त्यामुळे दोन्ही देशातील संबंध ताणले गेले नाहीत. भुत्तो पाक मध्ये लोकशाही स्थापण्यास प्रयत्न करत होते. त्यामुळे संबंध सुधारण्यास अनुकुलता निर्माण झाली १९७४ मध्ये पाकने बांग्लादेशाला मान्यता दिली. एप्रिल ७४ मध्ये भारत पाक बांग्लादेश करार होऊन युध्दबंदी पाकला परत देण्याचे मान्य करण्यात आले. भारत पाक सागरी विमान वाहतुक सुरू झाली प्रवासी सवलती दिल्या. १९७६ मध्ये राजनैतिक संबंध पुन्हा प्रस्थापित करण्यात आले. पण काश्मिर प्रश्न उकरून काढण्याची पाकची सवय कायम राहिली. १९७८ मध्ये मोरारजी देसाईंनी पाक अध्यक्ष झिया उल हक भेट घेऊन समान हितसंबंधावर चर्चा केली. १९८१ मध्ये पाक समोर अनाक्रमणाचा प्रस्ताव मांडला. पण पाककडून प्रतिसाद मिळाला नाही. उलट काश्मिर व पंजाबातील असंतुष्ट गटांना चिथावणी दिली. शस्त्रे पुरविली. पाकसीमेत लष्करी प्रशिक्षणाची सोय केली. त्यामुळे पंजाब काश्मिरात दहशतवादामुळे हिंसक परिस्थिती निर्माण झाली. भारताने पाककडे याबाबत तक्रार केली. पाक भागातून भारतावर दहशतवादी हल्ले होऊ लागले. पुरावे देऊनही पाक ते मान्य करत नाही,.

सारांश

१९४७ मध्ये फाळणी होऊन भारत पाक दोन राष्ट्रे निर्माण झाली. तेव्हापासून दोघांत विविध कारणांनी संघर्ष सुरू आहे. काश्मिर प्रश्न आजही अनुत्तरीत आहे. पाकची दहशतवादी कृत्ये सुरू आहेत. भारतात राजकीय अस्थिरता निर्माण करण्यास पाक प्रयत्नशील आहे. कारगील युध्द संसदेवरील हल्ला अक्षरधाम हल्ला मुंबईतील बॉम्ब स्फोट व दहशतवादी हल्ला ही त्याची अनेक उदाहरणे आहेत. व भारत खंबीरपणे त्यास तोंड देत आहे.

बांग्लादेश संबंध

पाकशी भारताचे संबंध बिघडण्यात पूर्व पाकची विभक्त होण्याची असलेली इच्छा हे ही एक कारण होते. त्यातून १९६५ मध्ये भारत पाक युध्द झाले. युनो मध्यस्थीने युध्द थांबल्यानंतरही संबंध सुधारले नाहीत. त्यातच पूर्व पाक मध्ये पश्चिम पाक विरोधी चळवळ १९७१ मध्ये सुरू झाली. त्यात भारत गोवला जाऊन भारत पाक युध्द झाले. पूर्व पाक मध्ये बंगाली तर पश्चिम पाक मध्ये पंजाबी अधिक होते. दोघांना एकत्र ठेवणे अशक्य होते. पश्चिम पाक मधल्या राजकीय व आर्थिक क्षेत्रातील बडया व्यक्तींनी सैन्य राजकारण अर्थव्यवस्था प्रशासन यावर वर्चस्व स्थापून पूर्व ेपाकचे शोषण चालविले होते. या अत्याचारांमुळे पूर्व पाक मध्ये लोकशाहीवादी चळवळीने जोर धरला. पूर्व पाकला स्वयंनिर्णयाचा हक्क मिळावा अशी त्यांची मागणी होती. पश्चिम पाकने ती चळवळ दडपण्याचा प्रयत्न केल्याने तेथे स्वातंञ्य लढा सुरू झाला.

डिसेंबर ७० मध्ये हुकूमशहा या*याखान यांनी पाक मध्ये निवडणुका घेतल्या. पूर्व पाक मध्ये अवामी लिगने शेख मुजिबुर रहमान नेतृत्त्वात ९९ जागा जिंकुन संसदेत बहुमत मिळविले. पण याहयाखान यांनी त्यांना सरकार स्थापन करू दिले नाही. तेव्हा अवामी लिगने नागरी कायदेभंगाची चळवळ सुरू केली. तेव्हा या*याखान यांनी दडपशाही सुरू केली. मुजिफुर रहमाना यांना पश्चिम पाकमध्ये अज्ञात स्थळी ठेवले. कत्तली सह प्रचंड अत्याचार पूर्व पाकमध्ये करण्यात येऊ लागले. त्यातून तेथे बंडास सुरूवात झाली. लिगचे काही कार्यकर्ते कलकत्त्यास आले व त्यांनी पूर्व पाकचे विद्रोही सरकार स्थापन केले. मुक्ती वाहिनी या मुक्ती स्ेानेची स्थापना करण्यात आली. जोरदार छुपे युध्द सुरू झाले पूर्व पाक मधील हिंदुच्या कत्तलीना सुरूवात झाली. या भागातील हिंदु मुस्लिम ख्रिश्चन बौध्दांनी भारतात आश्रय घेण्यास सुरूवात केली. १ कोटी पेक्षा जास्त निर्वासित भारतात आले. निर्वासितांबद्दलच्या सहानभुतीतून पाकविरोधी युध्दाची मागणी भारतात जोर धरू लागली. पाकने पूर्वपाक मध्ये भारताच्या चिथावणीने चळवळ सुरू झाल्याची टिका सुरू केल्याने इंदिरा गांधींनी सावधगिरीने पावले उचलली.

भारतात आलेल्या निर्वासितांमुळे अन्नधान्य साठा संपुष्टात येऊ लागला होता. अर्थव्यवस्था व राजकीय स्थैर्यावर मोठा ताण आला होता. या निर्वासितांच्या समस्येकडे जगाचे लक्ष वेधुन सहानुभूती मिळवणे आवश्यक होते. त्यामुळे इंदिराजी सावध पावले उचलत होत्या. निर्वासितांनी

परत जायला हवे पण त्यासाठी पाकने पूर्व पाकमध्ये चांगले वातावरण तयार करायला हवे असे इंदिरा गांधी वारंवार सांगत होत्या. शिवाय युध्द झाल्यास आपल्याला सोयीच्या वेळी होणे गरजेचे होते. पावसाळयात पूर्व पाक मधील सर्व नद्यांना पूर येऊन दलदल निर्माण होते. तेथे घुसणेही अशक्य होते. हिमालयातील खिंडी हिमवर्षावामुळे बंद झाल्यावर चीनला पाकला मदत देणे अशक्य होणार होते. व मुक्तीवाहिनीलाही तयारी साठी वेळ हवा होता.

इंदिरांजींची बांग्लादेश भूमिगत सरकारला मदत

पूर्व पाकला सर्व मदत देण्याचा इंदिराजींचा विचार होता. त्यानुसार बांग्लादेशच्या भूमिगत सरकारला आश्रय देण्यात आला. मुक्तीबाहिनीस भारतीय भूमीवर सर्व प्रकारचे लष्करी शिक्षण साहित्य व पैसा दिला. निर्वासितांच्या सोयीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर ताण आला होता. निर्वासितांचा प्रश्न शांततेने सुटणार नाही हे लक्षात घेऊन लष्करी कारवाईची तयारी करण्यात आली.

भारताच्या या राजनैतीक मोहिमेस पश्चिम युरोपिय राष्ट्रे रशिया व साम्यवादी युरोपिय राष्ट्रांचा अनुकुल प्रतिसाद मिळाला. अमेरिका चीनने मात्र विरोधी भूमिका घेतली. बांग्लादेशचा प्रश्न तेथील स्वातंत्र्याचा नसून भारत पाक मधील प्रश्न असल्याची भूमिका अमेरिकेने घेतली. अमेरिका व चीनने पाकला मदत दिली. अमेरिका व चीनी हस्तक्षेप टाळण्यासाठी भारताने रशियाशी ९ आ^गस्ट ७्र१ रोजी २० वर्षांचा मैत्री करार केला. कुणी मदत करो न करो आम्हाला काय करायचे ते आम्ही ठरवु असे इंदिराजींनी बीबीसीवरून ठणकावुन सांगितले. अखेरीस पाकने युध्द सुरू केले.

३डिसेंबर ७१ रोजी पाकने भारताच्या पश्चिम भागातील आठ लष्करी हवाई तळावर अचानक हवाई हल्ला केला. भारताचे नुकसान करून हा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन युनोस हस्तक्षेपास भाग पाडण्याचा पाकचा डाव होता. अर्थात पाकचे उद्देश सफल झाले नाही . भारताने विमाने आधीच हलविली असल्याने नुकसानही झाले नाही. भारताने ताबडतोब बांग्लादेशला राजनैतिक मान्यता दिली. पश्चिमेला पाक ला अडवुन पूर्व पाक युनो हस्तक्षेपापूर्वी मुक्त करण्याची भारताची योजना होती.

जनरल जगजितसिंग अरोरा नेतृत्त्वात व मुक्ती वाहिनी सहकार्याने ११ दिवसात भारताने ढाक्यापर्यंत मजल मारून तेथील पाक सैन्यास वेढा दिला. पाकचा पराभव होऊ नये म्हणून अमेरिकेने हस्तक्षेप केला. भारतास आक्रमक राष्ट्र ठरवुन भारताची आर्थिक मदत थांबविली. युनो सुरक्षा समितीत युध्द थांबबुन दोन्ही देशांनी सैन्य मागे घ्यावे असा ठराव केला त्याविरोधी रशियाने नकाराधिकाराचा वापर केला. ९ डिसेंबर ७१ रोजी अमेरिकेचे सातवे आरमार अणुशक्तीवर चालणाया युएसएस एंटरप्राईज नेतृत्त्वात बंगालच्या खाडीच्या दिशेने निघाले. पण इंदिराजींनी त्याकडे दुर्लक्ष करून लष्करप्रमुख जनरल माणकेशा यांना ढाक्का लवकर जिंकण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार १३ डिसेंबर रोजी ढाक्यास वेढा दिला. १६डिसेंबर रोजी ९३ हजार पाक सैन्य शरण आले. त्यानंतर भारताने पश्चिम सिमेवरील युध्द थांबविण्याची घोषणा केली. सैन्याचा पराक्रम व बांग्लादेशी जनतेची मदत यामुळे भारतास यश मिळाले.

परकीय व युनो हस्तक्षेप टाळण्यास व पाकचा भूभाग बळकावणे हा ही भारताचा हेतू नव्हता त्यामुळे युध्दबंदी जाहीर केली. पाकनेही ती मान्य करून मुजिफूर रहमान यांची मुक्तता केली. या युध्दामुळे भारतास प्रबळ शक्ती म्हणून ओळखले जाऊ लागले. दक्षिण आशियातील सत्तासमतोल बदलला. निर्वासितांचा प्रश्न सुटून त्यांना बांग्लादेशात पाठवुन देण्यात आले भारताने आपले सामथ्र्य दाखवुन दिले. सर्व धर्मीय भारतीय युध्द एकदिलाने लढले. व्दिराष्ट्रवादाच्या पाठिराख्यांनीच मुस्लिमांना बांग्लादेशात कशी वागणूक मिळते हे दाखवुन दिले इंदिराजींचा खंबीरपणा व नेतृत्त्वगुणांचा सर्वांना परिचय झाला यामुळेच त्यांचा पुढे भारतरत्न देऊन गौरव करण्यात आला. तर या युध्दामुळे अमेरिका भारत संबंध दुरावले. तर रशियाकडून मिळालेल्या नैतिक पाठिंब्यामुळे रशिया भारत जबळीक वाढली. पाक मध्ये या*याखान विरोधात जनमत तयार होऊन त्यांना राजीनामा दयावा लागला. २० डिसेंबर ७१ रोजी झुल्फीकार अली भु+ो यांनी ेपाकची सत्तासूत्रे स्वीकारली. पुढे १९७२ मध्ये पाक भारतात सिमला करार होऊन बांग्लादेशाची निर्मिती झाली. त्यास आ^गस्ट ७३ मध्ये पाकने राजनैतिक मान्यता दिली.

अशाप्रकारे बांग्लादेश निर्मितीत भारताने सहकार्य केले. बांग्लादेशातही सुरूवातीस कृतज्ञतेची भावना होती. शेख मुजीब अध्यक्ष असे पर्यंत दोन्ही देशात जिव्हाळयाचे संबंध होते. ७५ मध्ये असंतुष्ट लष्करी अधिकायांनी शेख मुजीब व कुटूंबाची हत्या केली. बांग्लादेेशात राजकीय अस्थिरता व आर्थिक हलाखीचा काळ सुरू झाला. यावेळी नव्या सत्ताधीशांशी पाक अमेरिका चीनने जवळीक साधली. भारत विरोधास चिथावणी दिली. त्यातून सिमेवर भारतास उपद्रूव होऊ लागला.

भारत बांग्लादेशात असणाया वादग्रस्त मुद्दयांपैकी फराक्काजवळ गंगा नदी पाण्याचे वाटप सीमानिश्चिती निर्वासितांचे लोंढे तसेच नागा व मिझोरम बंडोखोरांना बांग्लादेशातून होणारी मदत महत्त्वाचे होते. तणाव कमी करण्यास भारताने बराच प्रयत्न केला. १९७७ मध्ये गंगा पाणीवाटप वाद सोडविण्यास संयुक्त समिती स्थापन केली. नागा व मिझोरम बंडखोरांना प्रतिबंध करण्याचे बांग्लादेशाने मान्य केले. भारताने मैत्रीसाठी प्रयत्न केले. ७८ मध्ये पंतप्रधान मोरारजींनी बांग्लादेशास भेट दिली. १९८० मध्ये काँग्रेस शासनाने बांग्लादेशाशी ३ वर्षाचा करार करून सीमा निर्धारण रेल्वे दळणवळणाच्या सोयी सांस्कृतिक सहकार्य विषयावर विचारविनीमयास उच्चस्तरीय बैठका घेण्याचे ठरले. आसामातीाल बांग्ला निर्वासितांचा प्रश्न अनुत्तरीत राहिला. १९८२ मध्ये बांग्लादेशात जनरल ईशाद सत्तारूढ होऊन त्यांनी लष्करी कायदा लागू करत आर्थिक सुधारणांन वर लक्ष केंद्रित केले. भारताने त्यासाठी मदतीची तयारी दाखविली. ८५ मध्ये पूराने बांग्लादेशात मोठी हानी झाली. राजीब गांधींनी याबेळी बांग्लादेशला भेट दिली. मदतही देऊ केली. यामुळे दोन्ही देशातील दुरावा कमी झाला. बांग्लादेशाने सार्कचे सदस्यत्व स्वीकारले. सार्कची पहिली बैठक जनरल इशाद अध्यक्षतेत ढाक्यासच झाली.